चला स्विमिंग ला...
स्विमिंग सुट, गॉगल, स्विमिंग कॅप, बरमुडा स्विमिंग लेगींग्ज टॉप, व बरेच काही
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड,
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

नगर अ‍ॅग्रो फार्मर्स प्रोड्युसर कं.लि.
Reg No : U01110PN2020PTC194433
सुरक्षित व फायदेशीर गुंतवणूकीचे सुवर्णसंधी...
वेगाने विकसित होणाऱ्या इथेनॉल निर्मिती प्रकल्पात शेअर्स (भागभांडवल) स्वरूपात गुंतवणूक करून वार्षिक व्याज स्वरूपात फिक्स इनकम (हमखास परतावा) व मोठ्या प्रमाणात डिव्हिडंटचा लाभ मिळवा.
रजि.ऑफिस : अकोलकर हॉस्पिटलजवळ, बुरुडगावरोड, अहिल्यानगर, Email ID : nagaragrofpc@gmail.com
Mo : 7020360816, 9307230076

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २१.०४.२०२५ | अंक नं. १८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

फक्त फायदाच फायदा !
खरेदीवर पॉइंट पॉइंट्सवर गिफ्ट
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

अक्षय्यतृतीया सोनेरी फायदा
सोन्याचा भाव चढो किंवा उतरो फायदा तुमचाच
आजच 10% रक्कम भरून आपले सोने बुक करा
सोने खरेदी करतांना बुकिंगच्या वेळचा दर आणि खरेदीच्या वेळचा दर यातील कमी असलेल्या दरात सोने खरेदी करा
योजना 22 कॅरेट दागिन्यांवर लागू*
सदर ऑफर 30 एप्रिल 2025 पर्यंत वैध
22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# जखमी व्यक्तीला ‘सिव्हील’च्या पोर्चमध्ये टाकून २ जण पसार; उपचारापूर्वीच मृत्यू, फरार दुचाकीस्वार संशयाच्या भोवऱ्यात

नगर – एका जखमी व्यक्तीला दुचाकीवर जिल्हा शासकीय रुग्णालयात घेवून आलेल्या दोघांनी त्यास रुग्णालयाच्या पोर्चमध्ये टाकून तेथून धूम ठोकली. ही घटना लक्षात आल्यावर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी त्या व्यक्तीस उपचारासाठी रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले. हा प्रकार २० एप्रिलला पहाटे १.४५ च्या सुमारास घडला असून, त्या व्यक्तीला रुग्णालयाच्या पोर्चमध्ये टाकून पसार झालेले दोघे संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

दोन अनोळखी इसमांनी त्यांच्या मोटारसायकलवर एक अंदाजे ३८ वर्षीय अनोळखी इसमास २० एप्रिलला पहाटे १.४५ च्या सुमारास जिल्हा रुग्णालयात आणले. मात्र रुग्णालयाच्या पोर्चमध्ये त्याला टाकून ते संशयास्पदरित्या तेथून तातडीने निघून गेले. काही वेळात ही बाब तेथील सुरक्षारक्षकाच्या निदर्शनास आली, त्याने रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना सांगितले. कर्मचाऱ्यांनी सदर व्यक्तीला उपचारासाठी आतमध्ये नेले. तेथे असलेले मेडिकल ऑफिसर डॉ. आर.के. कुलकर्णी यांनी त्यास तपासले असता तो व्यक्ती उपचारापूर्वीच मयत झाल्याचे समोर आले. ही बाब त्यांनी पो.हे.कॉ. दीपक जाधव यांना सांगितली. त्यांनी दिलेल्या माहितीवरुन तोफखाना पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. पुढील तपास पोलीस हवालदार गंगावणे हे करीत आहेत.

मयत व्यक्तीचे वर्णन चेहरा उभट, रंग काळा सावळा, उंची ५ फुट ६ इंच, अंगाने सडपातळ, अंगात फिक्कट पिस्ता रंगाचा शर्ट, काळ्या रंगाची हाफ नाईट पॅन्ट, दाढी काळी पांढरी वाढलेली, पांढऱ्या रंगाचे बनियन घातलेले, डोक्याचे केस वाढलेले असे आहे. या मृत इसमास कोणी ओळखत असल्यास अगर त्याच्या नातेवाईकाबाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी तोफखाना पोलिस ठाणे ०२४१ २४१६११८, मोबाईल नंबर ९५५२५२१५८४ यावर संपर्क करावा, असे आवाहन तोफखाना पोलिसांनी केले आहे.


### पार्किंगमध्येही आढळला एक मृतदेह

दरम्यान जिल्हा रुग्णालयाच्या टीबी वॉर्डच्या पार्किंगमध्येही २० एप्रिल रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास एक अंदाजे ६० वर्षीय अनोळखी इसम बेशुद्धावस्थेत मिळून आला. त्यास रुग्णालयात दाखल करून मेडिकल ऑफिसर डॉ. कोल्हे यांनी तपासले असता तो उपचारापूर्वीच मयत झाला असल्याचे समोर आले. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी डॉ. कोल्हे यांनी दिलेल्या माहितीवरून आकस्मात मृत्यूची नोंद केली असून, अधिक तपास पोलीस हवालदार सुनील आंधळे करीत आहे.

# केडगाव देवी मंदिर परिसरात ३ ठिकाणी चोऱ्या; सोन्या-चांदीचे दागिने, रोकड व साहित्य लंपास

नगर –केडगाव उपनगरात देवी मंदिर परिसरात तीन ठिकाणी चोरट्यांनी घरात चोऱ्या करत सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम व इतर साहित्य चोरून नेले. १७ एप्रिल ते १९ एप्रिल दरम्यान अमितनगर, एकता कॉलनी व धनश्री कॉलनी येथे या घटना घडल्या. या प्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संगिता आसाराम भताने (वय ४०, रा. अमितनगर, केडगाव देवी रोड, केडगाव) यांनी फिर्याद दिली. या फिर्यादीत म्हटले आहे की भताने कुटूंब नातेवाईकाच्या लग्ना करीता सुरत, गुजरात येथे दोन दिवसापूर्वी गेले होते. त्यानंतर १९ एप्रिल रोजी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास अमितनगर येथील घरी आले असता त्यांना त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाला लावलेले कुलूप तुटलेले व कडी कोयंडा कशानेतरी वाकवून दरवाजा उघडलेला दिसला. त्यानंतर त्यांनी घरात प्रवेश केला असता घरातील लाकडी शोकेसच्या डावे कपाटातील साड्या व इतर सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. घरातील दागिन्यांची शोधाशोध केली असता कपाटातील सोन्याचांदीचे मिळून आले नाही. म्हणून त्यांची खात्री झाली की कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी घरातील सामानाची उचकापाचक करुन सोने चांदीचे दागिने, व रोख रक्कम चोरून नेली. १० ग्रॅम सोन्याचे दागिने, *(पुढील मजकूर पान ७ वर)*

प्लॉट विकणे आहे


पुणे नगर हायवे टच (वास्तूशास्त्रानुसार)
पत्ता – पठारे पेट्रोल पंपाच्या मागे,
गट नं.६३७/१/१, सुपा ता पारनेर जि. अ.नगर
५७०००.०० चौ. फुट (५३००.०० चौ.मी.) मंजूर बांधकाम नकाशे व एन.ए.ऑर्डर
संपर्क : 9822092146/ 9975596735

बाळ आजारी आहे का?
▪ ते वारंवार आजारी असणे ▪ नेहमी सर्दी, खोकला
▪ वारंवार होणारा बाल दमा ▪ वारंवार जुलाब होणे
▪ प्रतिकारशक्ती कमी असणे ▪ वजन, उंची कमी
या तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
*सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
*सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
संपर्क : मो. ९५११११०४४४
डॉ.अनिरुद्ध गिते MBBS / MD paeds
अक्षय मुलांचे हॉस्पिटल बालिकाश्रम रोड, अ.नगर

SONI Since 1965 TILES AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

भांड्यांवर पांढरे डाग पडत आहेत?
मग आजच घरी आणा अत्याधुनिक इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर कंडिशनर
जे बनवते जड व क्षारयुक्त पाण्याला शुद्ध!
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE

चौथे पुण्यस्मरण
कै. नागनाथ महादू जगताप
जन्म दि. ०७/०१/१९३८ । स्व. दि. २१/०४/२०२१
आपल्या प्रेमळ सहवासाची सवय झाली होती
न जाणे तुम्हाला बोलवण्यासाठी
ईश्वराला काय घाई होती...
आपले नम्र
गंगाधर नागनाथ जगताप । सुभाष (बंडु) नागनाथ जगताप
फर्म : श्रीनाथ टी सेंटर । हॉटेल केतन, सावेडी, अ.नगर.
समस्त जगताप परिवार

An ISO 9001:2015 Certified
DiSHA® COMPUTER INSTITUTE
MAHA DISCOUNT offer in Any Course
Just 1800/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, BD CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, CHAT GPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## प्रेरणादायी अक्षरधन...






### त्याच्या मनाचा 'ठावच' लागत नाही

गेल्या शतकातील, मराठी साहित्यातले एक आदरणीय साहित्यिक म्हणजे राम गणेश (रा.ग.) गडकरी. त्यांच्या ठायी आर्त काव्यात्मता अन् स्वैर मिश्कीलपणा यांचे मोठे मजेदार मिश्रण झाले होते. त्यातून खालील श्लोक निर्माण झाला.

**''यावज्जीवही कायमी, न कळलें आप्तांप्रती नीटसें**
**मित्रांतेही कळे न गूढ ! नकळे माझे मलाही तसे**
**अज्ञाता! मरणोत्तर प्रकट तें होईल तूंतें कसे?**
**कोठें आणि कधीतरी जगति मी होऊन गेलो असें !**

मानवी मन हे एक मोठे विचित्र गूढ आहे. ते इतक्या विविध रूपांनी प्रकट होते, की त्यातले कोणते रूप खरे मानावे, हे त्याचे त्यालाच समजत नाही! मग ते इतरांना कसे उमजणार?

गडकऱ्यांचे हे म्हणणे प्रथमदर्शनी अगदी पूर्ण सत्य आहे असे वाटते. पण थोडे खोल जाऊन पाहिले तर गडकऱ्यांना सुद्धा ते अर्धसत्यच वाटत असावे! कारण त्या गवितेच्या खाली त्यांनी १ एप्रिल १९१८ अशी तारीख दिली असून, इंग्रजीत 'एका एप्रिल फूलची कामगिरी' An April Fool's Work अशी मल्लिनाथीही त्या तारखेला जोडली आहे.

'टॉलस्टॉय आणि त्याची पत्नी' या नावाच्या एका रशियन लेखकाचे पुस्तक वि. स. खांडेकरांनी वाचले तेव्हा टॉलस्टॉयच्या समाधीवर तो लेखक टॉलस्टॉयच्या विधवा पत्नीबरोबर जातो तेव्हा फुलं, श्रद्धांजली वाहिल्यानंतर ती सहज बोलून गेली की, ''लेव्हबरोबर (टॉलस्टॉय) मी ४८ वर्षे काढली त्याची सहधर्मिणी म्हणून! पण खरोखर त्याचा स्वभाव काय होता हे मला कधीच कळलं नाही!'' त्याचा मनाचा मला ठावच लागला नाही.

## रामधन भगवाने यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार – येथील नेहरू कॉलनीतील रहिवासी व वाल्मिक समाज संस्था पंचायतचे सदस्य रामधन छबु भगवाने (वय ८१) यांचे २० एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, २ सुना, नातवंडे, ३ भाऊ, भावजय असा परिवार आहे.

## सौ. मृणालताई बिहाणी यांचे निधन



नगर – विराज इस्टेट येथील आशिर्वाद बंगल्यातील रहिवासी सौ. मृणालताई दिनेश बिहाणी (वय ४०) यांचे २० एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगी, १ मुलगा, आजी–आजोबा असा परिवार आहे. ॲड. दिनेश बिहाणी यांच्या त्या पत्नी होत.


## मधुकर कार्ले यांचे अल्प आजाराने निधन



नगर – विनायकनगर येथील समता कॉलनीतील रहिवासी मधुकर महादू कार्ले (वय ६९) यांचे १९ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## रमाकांत मुळे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – पानसरे गल्ली येथील रहिवासी रमाकांत मुरलीधर मुळे (वय ९३) यांचे १९ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, ३ मुली, सुना, नातवंडे, पणती, पणतू असा परिवार आहे. जयश्री, ज्योत्स्ना, साधना, विनायक, अनंता मुळे यांचे ते वडील होत.

## विमलबाई बच्चा यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – चितळे रोडवरील पापय्या गल्लीतील रहिवासी विमलबाई राजाराम बच्चा (वय ८५) यांचे १९ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. श्रीनिवास, गिरीश बच्चा यांच्या त्या मातोश्री होत. अ.नगर प्रिटींग प्रेस असो. अलाईड ओनर्सचे माजी अध्यक्ष गिरीश बच्चा यांच्या त्या मातोश्री होत.

## नामदेवराव कोके यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – येथील रहिवासी नामदेवराव कोके (वय ८५) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्यामागे १ मुलगा, १ मुलगी, नातु, नाती असा परिवार आहे. नामदेवराव हे धार्मिक प्रवृत्तीचे होते.

प्रसाद हॉटेलचे संचालक विनायक कोके पा. यांचे ते वडील होत.

# श्रीरामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडीट सोसायटीच्या निवडणुकीत सद्भावना पॅनेलचे सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्क्याने विजयी



नगर – येथील श्रीरामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडीट सोसायटी लि.,च्या संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूकीचे मतदान २० एप्रिलला सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत भवानीनगर येथील श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाऊंडेशन स्कूलमध्ये झाले. सोसायटीच्या पारदर्शक कामकाजामुळे सद्भावना पॅनेलचे सर्वच्या सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. सभासदांनी सोसायटीची सूत्रे संस्थापक अध्यक्ष श्रीगोपाल धूत यांच्याच हाती असणे सोसायटी हिताचे आहे, हे मतांच्या माध्यमातून सांगितले.

निवडणूक निर्णय अधिकारी शुभांगी गोंड यांनी रात्री ८ वाजता निकाल जाहीर केला. ढोल–ताशाच्या गजरात, गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि पेढ्यांचे वाटप करत या निकालाचे स्वागत करण्यात आले. उपस्थित सर्वांनीच आनंदोत्सव साजरा केला. मतमोजणी स्थळापासून विशाल गणेश मंदिरापर्यंत विजयी मिरवणूक काढण्यात आली.

प्रचाराचा नारळ फोडलेल्या या मंदिरात विजयोत्सव साजरा करताना सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष श्रीगोपाल धूत म्हणाले, मला प्रकृतीमुळे सर्व सभासदांपर्यंत पोहोचता आले नाही तरीही सभासदांनी आपलेपणाने भरभरून मतांचे दान देत विश्वास व्यक्त केला याबद्दल सभासदांचा ऋणी आहे. सोसायटीचे कामकाज यापुढेही सभासद हितास प्राधान्य देत असेच पारदर्शीपणे चालेल. आपल्या सर्वांच्या सहकार्याने सोसायटी प्रगतीपथावरच राहिल.

सद्भावना पॅनलच्या पाच जागा मतदानाअगोदरच बिनविरोध झाल्या होत्या. सर्वसाधारण मतदारसंघातून सद्भावना पॅनलच्या १५ उमेदवारांनी निवडणूक लढवली. सर्वच्या सर्व उमेदवार विजयी झाले. त्यांना मिळालेली मते अशी :– श्रीगोपाल धूत (८८३), अनुराग धूत (८३६), लक्ष्मीकांत झंवर (८०५), राजेंद्र मालू (८०२), किसनलाल बंग (७९९), प्रकाश गांधी (७९५), राजेंद्र गुजराथी (७८९), सुधीर झालानी (७८३), विश्वनाथ कासट (७७७), गोपाल मणियार (७५७), प्रदिप पंजाबी (७४०), ॲड. अशोक बंग (७२४), ओमप्रकाश चांडक (७२०), मधुसुदन सारडा (७१९) आणि राजेंद्रकुमार कंत्रोड (६५५)

विरोधी पराभूत झालेले उमेदवार व त्यांना मिळालेली मते अशी :– विष्णू सारडा (४६८), जगदिश दरक (३६८), सुनिल मुंदडा (३३२).

सद्भावना पॅनलमधील राजकमल मणियार व शोभा राठी या महिला राखीव मतदार संघामधून साईनाथ कावट हे विमुक्त जाती व भटक्या जमाती मतदार संघामधून अनुरिता झगडे या इतर मागासवर्गीय विभागामधून तर देवराव साठे हे अनुसूचित जाती/जमाती विभागामधून बिनविरोध निवडून आले. सद्भावना पॅनलच्या सर्व विजयी उमेदवारांवर अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला आहे.

## भिंगारमध्ये २ गावठी दारू अड्ड्यांवर छापा

नगर – भिंगार पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरु असलेल्या २ गावठी दारु अड्ड्यावर भिंगार पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत ६ हजार ६०० रुपयाची गावठी दारु जप्त करुन महिलेसह एकास ताब्यात घेतले. ही कारवाई आलमगीर, ब्रह्मतळे आणि कापूरवाडी शिवारात २० एप्रिल रोजी केली.

या कारवाईत आलमगीर, ब्रह्मतळे येथील घराच्या आडोशाला सुरु असलेल्या दारु अड्ड्यावर छापा टाकून एका महिलेस ताब्यात घेतले. तसेच दुसऱ्या कारवाईत कापूरवाडी शिवारात घराच्या आडोशाला सुरु असलेल्या दारु अड्ड्यावर छापा टाकून भाऊसाहेब मुरलीधर पवार (वय ७२, रा. कापूरवाडी, ता. नगर) यास ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# प.बंगालमधील हिंसाचाराविरुद्ध राष्ट्रपतींसाठी विश्व हिंदू परिषदेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



प. बंगालमधील हिंसाचाराविषयी राष्ट्रपतींसाठी विश्व हिंदू परिषदच्यावतीने जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे निवेदन सादर केले.

नगर – पश्चिम बंगालमध्ये वक्फ कायद्याच्या विरोधाच्या नावाखाली सुरु असलेल्या हिंसाचाराचा निषेध करत, हिंदू समाजावर होत असलेल्या अत्याचारांविरुद्ध विश्व हिंदू परिषद, अहिल्यानगरच्या जिल्हा शिष्टमंडळाने भारताच्या राष्ट्रपतींसाठी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे निवेदन सादर केले.

निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांना भेटून निवेदन देताना शिष्टमंडळात विहिंपचे जिल्हाध्यक्ष आशुतोष लांडगे, बजरंग दलाचे महाराष्ट्र–गोवा क्षेत्रीय संयोजक विवेक कुलकर्णी, विहिंपचे जिल्हा सहमंत्री शरदराव नगरकर, जिल्हा धर्माचार्य संपर्क प्रमुख हभप मिलिंद चवंडके, जिल्हा मंदिर–अर्चक पुरोहित संपर्क प्रमुख श्रीकांत नांदापूरकर, प्रखंड मंत्री अमोल कोठारी, प्रखंड मंत्री विरेंद्र शिंदे, प्रखंड मंत्री राजेंद्र चुंबळकर, गजेन्द्र सोनवणे, गजानन कराळे, अमोल दंडवते आदींचा समावेश होता.

या निवेदनात म्हटले आहे की, मुर्शिदाबाद येथून सुरू झालेली हिंसा आता संपूर्ण बंगालमध्ये पसरली आहे. हिंदू धर्मीयांच्या घरी जाळपोळ, लूटमार, हत्याकांड, महिलांवर अत्याचार हे प्रकार सुरू आहेत. वक्फ कायदा हा केवळ एक बहाणा असून, खरा हेतू मुर्शिदाबादला हिंदूविरहित करणे हा आहे. या हिंसेत २०० हून अधिक घरे व दुकाने जाळण्यात आली असून, शेकडो हिंदू जखमी झाले आहेत. तीन जणांचा निर्घृण खून झाला आहे. ५०० हून अधिक कुटुंबांना स्थलांतर करावे लागले आहे.

शासन यंत्रणा निष्क्रिय ठरल्याचे स्पष्टपणे दिसते आहे. काही ठिकाणी तर प्रशासनच या हिंसक कारवायांना प्रेरणा देत आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या पीडितांची भेट घेण्याऐवजी दंगल भडकावणाऱ्या इमामांची भेट घेत आहेत, असे निवेदनात म्हटले आहे.

विहिंपने निवेदनात केलेल्या मागण्या अशा – १. पश्चिम बंगालमध्ये तात्काळ राष्ट्रपती शासन लागू करण्यात यावे. २. या हिंसाचाराची चौकशी राष्ट्रीय तपास संस्था (NIA) कडून करण्यात यावी. ३. राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी केंद्रीय सुरक्षा दलांकडे सोपवण्यात यावी. ४. बांगलादेशी व रोहिंग्या घुसखोरांची ओळख पटवून त्यांना देशाबाहेर हाकलण्यात यावे आणि भारत–बांगलादेश सीमारेषेवर तात्काळ कुंपण घालण्याचे काम सुरू करण्यात यावे.

देशाच्या सार्वभौमत्वाच्या संरक्षणासाठी त्वरित आणि कठोर पावले उचलावीत, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेने राष्ट्रपतींकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# खांबावरून पडून तरुणाचा मृत्यू

नगर – एका खासगी कंपनीच्या सबस्टेशनमध्ये खांबावर चढलेल्या अकुशल कामगार तरुणास विजेचा जोरदार धक्का लागून जमिनीवर कोसळल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील बाळेवाडी शिवारातील डोंगरात १८ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास घडली. राहुल निवृत्ती पालवे (वय २५, रा.बाळेवाडी, ता.नगर) असे मयत तरुणाचे नाव आहे.

खासगी कंपनीचे नगर तालुक्यातील बाळेवाडी शिवारात डोंगरात सबस्टेशन आहे. दोन महिन्यांपूर्वीच येथे अकुशल कामगार म्हणून या तरुणास या सबस्टेशनवर कामास घेतले होते. १८ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजता राहुल यास अधिकार्याने पोलवर चढण्यास सांगितले. विजेचा पुरवठा चालू असताना कोणतीही काळजी न घेतल्याने राहुल यास विजेचा तिव्र धक्का बसताच तो उंच टॉवरवरून जमिनीवर कोसळताच त्याचा जागीच मृत्यू झाला. रात्री उशीरा त्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेच्या निषेधार्थ १९ एप्रिल रोजी सकाळीच बाळेवाडी ग्रामस्थांनी कंपनीच्या सबस्टेशनवर ठिय्या आंदोलन केले. संतापलेल्या ग्रामस्थांनी सबस्टेशनला टाळे ठोकले. त्यामुळे घाबरलेल्या कंपनीच्या अधिकारी–कर्मचार्यांनी तेथून पळ काढला.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत ग्रामस्थांची समजूत घातली.

# केडगाव ते विळद बायपास रस्त्यावर कारच्या धडकेत एक ठार, महिला जखमी

नगर – केडगाव ते विळद बायपास रस्त्यावर एमआयडीसीकडून केडगावकडे जाणाऱ्या भरधाव कारने दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीवरील एकाच मृत्यू झाला. तर, एक महिला गंभीर जखमी झाली आहे. १८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. दत्तात्रय रामचंद्र कर्डिले असे मयत दुचाकीस्वाराचे नाव आहे. तर त्यांच्या पत्नी मंदाकिनी या जखमी झाल्या आहेत.

या प्रकरणी विजय पाराजी लांडे (रा. लांडेस्थळ, नालेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कार चालकावर तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कर्डिले दाम्पत्य बायपास रस्त्यावरून वारुळाचा मारुती उपरस्त्याकडे जाण्यासाठी रस्ता ओलांडत असताना एका हुंदाई कंपनीच्या आय २० कारने (क्र. एमएच १२ एसवाय ७४२६) त्यांच्या दुचाकीला (क्र. एमएच १६ बीइ ५४०९) जोराची धडक दिली. यात दत्तात्रय कर्डिले मयत झाले. तर मंदाकिनी यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली.

घटनेनंतर कार चालक पसार झाला आहे. तोफखाना पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास उपनिरीक्षक सचिन रनशेवरे करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



पुणे येथे नुकतीच शिक्षक भारती संघटनेची राज्य कार्यकारणी बैठक झाली.

# हिंदी सक्तीला विरोध, सी.बी.एस.सी. अभ्यासक्रमाला पाठिंबा

### शिक्षक भारती राज्य कार्यकारणी सभेत ठराव मंजूर

नगर – साने गुरुजी स्मारक पुणे येथे नुकतीच शिक्षक भारती संघटनेची राज्य कार्यकारणी बैठक झाली. यात शालेय शिक्षण विभागाने सी.बी. एस.सी. अभ्यासक्रमाची अंमलबजावणी सुरू केल्याबद्दल शिक्षक भारती संघटनेने शिक्षण मंत्र्याच्या अभिनंदन केले. परंतु हिंदी विषय इयत्ता पहिलीपासून सक्तीचा करू नये, हिंदी विषय ऐच्छिक असावा, मातृभाषा निवडण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना असावे व १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द करावा, त्यामुळे हजारो शिक्षक अतिरिक्त होत आहे. पूर्वीप्रमाणे संच मान्यता करावी व कला क्रीडासाठी स्वतंत्र शिक्षक द्यावे, आदी मागण्यांचे ठराव सहविचार सभेत मंजूर झाले.


महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष व राज्य कार्यकारणी पदाधिकारी बैठकीस उपस्थित होते.

परभणी येथे दुदैवी मृत्यू झालेल्या शिक्षक सोपान पालवे यांना संघटनेच्यावतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी शिक्षक भारती महाराष्ट्र राज्याध्यक्ष अशोक बेलसरे, प्राथमिक विभाग राज्याध्यक्ष नवनाथ गेंड, कार्याध्यक्ष सुभाष मोरे, प्रमुख कार्यवाह संजय वेतुरेकर, उपाध्यक्ष राजेंद्र झाडे, धनाजी पाटील, सुरेश देवकर, जुनिअर कॉलेज युनिट अध्यक्ष जी. टी. पाटील, पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर, नाशिक विभाग अध्यक्ष विनोद रोकडे, भाऊराव पात्रे, शरद गिरमकर, रूपालीताई कुरुमकर, जिल्हाध्यक्ष रामराव काळे, आप्पासाहेब जगताप, नारायण वाघ, साहेबराव पवार, दादासाहेब जगताप, राजीव शिरसठ, चंद्रशेखर हासे, गोपाल दराडे, संजय भोकरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय वेतुरेकर तर सूत्रसंचालन महेश पाडेकर यांनी केले.

# 'हिंदी सक्तीचा' निर्णय त्वरित मागे घ्यावा अन्यथा संपूर्ण राज्यभर आंदोलन छेडणार

### मराठीच्या अस्तित्वावर घाला, भारतीय जनता पार्टी सरकारचा महाराष्ट्रद्रोही निर्णय : ॲड. सुभाष लांडे



नगर – भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र राज्य कौन्सिलने एक स्पष्ट भूमिका घेत, महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती करण्याचा निर्णय तातडीने रद्द करण्याची मागणी केली आहे. राज्य सरकारचा हा निर्णय मराठी भाषेच्या, महाराष्ट्राच्या अस्मितेच्या आणि संस्कृतीच्या मुळावर झालेला हल्ला आहे, असे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे म्हणणे असल्याची भूमिका भाकपचे राज्य सचिव कॉ. ॲड.सुभाष लांडे यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र ही मराठी भाषिकांची भूमी असून, इथे मराठी हीच शिकवणीची प्रमुख भाषा असावी, ही जनतेची भावना आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची घोषणा करताच दुसऱ्याच बाजूने हिंदीची सक्ती लादणे म्हणजे दुहेरी भूमिकेचा प्रत्यय आहे. भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे महाराष्ट्रविरोधी असल्याचे यामुळे पुन्हा स्पष्ट झाले असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मुंबईसारख्या शहरात मराठीत बोलण्याची गरज नाही, असे विधान आणि शिक्षणात हिंदीची सक्ती हे सगळे निर्णय एकाच दिशेने जात असून, मराठी भाषेला व समाजाला दुय्यम ठरवण्याचा प्रयत्न आहे. या पार्श्वभूमीवर, भाजपचा खरा चेहरा जनतेसमोर आला आहे.

भारतीय कम्युनिस्ट पक्ष सर्व भाषांचा आदर करतो, मात्र कोणत्याही भाषेची सक्ती ही अयोग्य आहे. शिक्षणात भाषा निवडीचे स्वातंत्र्य असावे. पहिली ते पाचवीच्या कोवळ्या वयातील विद्यार्थ्यांवर भाषेची सक्ती लादणे म्हणजे बालमानसशास्त्राच्या विरोधात जाणे होय. सरकारने हा निर्णय तात्काळ मागे घेतला नाही, तर संपूर्ण राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भारतीय कम्युनिस्ट पक्ष महाराष्ट्र राज्य कौन्सिलने दिला असल्याची माहिती कॉ. ॲड. सुभाष लांडे यांनी दिली आहे.

# नागापूर परिसरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण; गुन्हा दाखल

नगर – एमआयडीसी परिसरातील चेतना कॉलनी, नागापूर येथून १५ वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञाताने लग्नाचे आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याची घटना २० एप्रिल रोजी दुपारी घडली. याबाबत अपहृत मुलीच्या वडिलांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीत म्हटले आहे की चेतना कॉलनी येथील राहत्या घरातून आपल्या मुलीला अज्ञात इसमाने लग्नाचे आमिष दाखवून फूस लावून पळवून नेले आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल केला. तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करीत आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### दही खा पण योग्य प्रमाणात

दही योग्य वेळेत आणि योग्य प्रमाणात खाल्ल्यास आरोग्यास अगणित लाभ मिळतील. आरोग्याची होणारी हानी टाळण्यासाठी दही सकाळी किंवा दुपारच्या वेळेस खाणे फायदेशीर ठरेल. याने पचनाशी संबंधित समस्या निर्माण होणार नाहीत. रात्रीच्या वेळेस दही खाऊ नये. यावेळेत दही खाल्ल्यास सर्दी, कफ-खोकला किंवा ॲलर्जी होऊ शकते.

## पाककला

### सॅण्डविच ढोकळा

**साहित्य :** १ कप बेसन, ३/४ कप पाणी, २ टेबलस्पून तेल, २ टेबलस्पून साखर, १/२ टेबलस्पून सायॅट्रिक ॲसिड (लिंबू फुल) किंवा लिंबाचा रस, १/४ टेबलस्पून हिंग, १/४ टीस्पून हळद, १/२ टेबलस्पून मीठ, १/२ टेबलस्पून बेकिंग सोडा, फोडणीसाठी लागणारे घटक, २ टेबलस्पून तेल, १ टेबलस्पून राई, १/४ टेबल स्पून हिंग, १ टेबलस्पून लिंबाचा रस, २ टेबलस्पून साखर, ४ टेबलस्पून पाणी, १/४ कप सॉस, २ टेबलस्पून डाळिंबाचे दाणे, ४ टेबलस्पून बारीक शेव

**कृती :** पाणी, तेल, मीठ, साखर, हिंग आणि चिमूटभर हळद मिक्सर मधून फिरवून घ्यावे. त्यात बेसन घालून परत मिक्सर मधून फिरवून घ्यावे. तयार झालेले बॅटर दहा मिनिटे झाकून ठेवावे. नंतर त्यात बेकिंग सोडा घालून फेसून घ्यावे. वाटीला तेल लावून त्यात तयार केलेले मिश्रण ओतावे. एका भांड्यात पाणी घालून त्यावर चाळणी ठेवून त्यात मिश्रणाने भरलेल्या वाट्या ठेवून वरून झाकण ठेवावे. दहा ते बारा मिनिटे मध्यम आचेवर ढोकळा वाफवून घ्यावा. ढोकळा थंड होई पर्यंत फोडणी तयार करून घ्यावी. एका कढईत तेल घालून त्यात राई घालून ती तडतडल्यावर त्यात हिंग व पाणी घालावे त्यात लिंबाचा रस आणि साखर घालून दोन मिनिटे उकळवून घ्यावे. थंड झालेले ढोकळे मधून कापून त्यावर तयार केलेली फोडणी पसरवावी. ढोकळ्याच्या एका बाजूला चटणी लावून घ्यावी. चटणी लावलेल्या बाजूवर ढोकळ्याचा दुसरा भाग ठेवावा. वरून सॉस लावावा त्यावर बारीक शेव व डाळिंबाचे दाणे घालून सर्व्ह करावे.

## वास्तू

### दरवाजे व खिडक्यांची काळजी

दरवाजे व खिडक्यांमधील भेगा अशुभ मानल्या जातात. जर घरात तुटलेली काच, दरवाजा किंवा खिडकी असेल तर ती ताबडतोब बदलावी. कारण तुटलेल्या वस्तू नकारात्मक ऊर्जा आकर्षित करतात.

## सल्ला

चपातीचे पीठ मळताना त्यात एक चमचा तेल टाकावे चपात्या मऊसुत होतात.

## सौंदर्य

वाफ घेतल्याने चेहऱ्याची छिद्रे उघडतात. त्यामुळे चेहरा आतून स्वच्छ होतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २२ एप्रिल २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, श्रवण १२|४४, सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०५ वा. ४२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आरोप-प्रत्यारोप करणे अंगलट येईल. मोठ्यांचा सल्ला घ्याल. आरोग्य चांगले राहील.

**वृषभ :** आरोग्य चांगले राहिल. मनावर नियंत्रण ठेवल्याने इच्छित कार्य पूर्ण होतील.

**मिथुन :** आर्थिक नुकसान होईल. राजकीय व्यक्तींसाठी आजचा दिवस जोमदार ठरेल. सरकारी कामे पूर्ण होतील.

**कर्क :** वरिष्ठांची सल्ला घेऊन पाउल टाकाल. न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल. मनात असलेल्या योजना पूर्ण होतील.

**सिंह :** अडकलेली कार्य पूर्ण होतील. कौटुंबिक आनंदाचे वातावरण राहील.

**कन्या :** धर्मविषयक कामामध्ये पैसा खर्च होईल. सामुदायिक कार्यांमध्ये सहभागी व्हाल.

**तूळ :** समाधानकारक स्थिती मिळेल. आर्थिक लाभ मिळेल.

**वृश्चिक :** भावनांच्या भरात नुकसान होण्याची शक्यता आहे. कुटुंबियांच्या सहवासामुळे दिवस आनंदात जाईल.

**धनु :** संपूर्ण दिवस वातावरण सकारात्मक राहिल. खाण्या-पिण्या विषयक पथ्ये पाळावी लागतील.

**मकर :** मध्यम स्वरूपाची कार्ये पूर्ण होतील. प्रवासाचे योग संभवतात.

**कुंभ :** आर्थिक विषयांमध्ये देवाण-घेवाण टाळा. हसत खेळत वेळ खर्च होईल. पैसे मिळवण्याचा एखादा मार्ग सापडेल.

**मीन :** आरोग्य नरम-गरम राहील.काही आवश्यक कार्ये पूर्ण होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!


बंड्या : मास्तरांनी मला मारलं
बाबा : काहीतरी अगाऊगिरी केली असशील
बंड्या : मास्तरांनी प्रश्न विचारला की ३ लिंगे कोणती?
बाबा : मग तू काय म्हणालास?
बंड्या : पुल्लिंग, स्त्रिलिंग व नपुसकलिंग
बाबा : बरोबर आहे, मग का मारलं?
बंड्या : मास्तरांनी उदाहरण विचारले
बाबा : तू काय म्हणालास?
बंड्या : तो फळा, ती शाळा आणि ते मास्तर

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* दुबई येथे पार पडलेल्या अंडर १९ क्रिकेट आशियन कपचा विजेता कोण? - भारत

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७१६० सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१५९ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) मुंबईवर झालेल्या हल्ल्यातील एक अतिरेकी ज्याला फाशी दिले गेले ७) जास्तीतजास्त ; अतिशयपणा ८) भरभर (झाडावर वगैरे चढणे) ९) दाट झाडी असलेली जागा ११) जळून राख झालेले १२) प्रवाहाचे आणलेले पाणी १५) गव्हाचे कणीदार पीठ १७) वाम; वाईट; खराब १९) या काचेत प्रतिबिंब दिसते; दर्पण २०) एक चर्मवाद्य; शंकराजवळ असलेले वाद्य २२) वेतन; पेमेंट २३) एक फळ २४) घोडा; अश्व; टार

**उभे शब्द :-** १) एक मोगल राजा २) जामीन; प्रतिभू; हमी ३) घाण; विष्ठा ४) परीक्षा; सत्त्व; चाचणी ५) सम; समान; बरोबर ६) बसण्यासाठीचे एक छोटे वस्त्र; लहान आसन १०) वडिलांचे संबोधन १३) एक खनिज द्रव्य १४) तळलेला एक खमंग खाद्यपदार्थ १६) लेकरू; पाडस; पिलू १८) मोठी वाटी १९) अमावास्या २१) एक सुगंधी वनस्पती २२) पाय; हुद्दा; अधिकाराची जागा; नाटकातील गीत

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** स्वत:वर विजय मिळविणे हे हजारो शत्रुंवर विजय मिळविण्यापेक्षाही बेहतर आहे.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### गारा कशा तयार होतात?

गारा म्हणजे इंग्रजीत हेलस्ट्रोम होय, काहीवेळा जेव्हा आसमंतात ढग असतात व जमिनीलगतची हवा तापते तेव्हा तिचे ऊर्ध्वगामी वहन सुरू होते त्याचवेळी आकाशातील ढग जमिनीवरील कमी दाबाच्या पट्ट्यामुळे बरसायला लागतात तेव्हा ऊर्ध्वगामी जोराचा वारा त्या पडणाऱ्या पावसाला व ढगाला वरती ढकलत असतो, त्यामुळे जसजसे वर जावे तसतसे तापमान कमी होण्याच्या नियमानुसार त्या पाण्याच्या थेंबांचे रूपांतर गारात होण्यास सुरुवात होते, गारा बनण्याच्या प्रक्रियेत त्या गारा एकमेकांना चिकटून त्यांचा आकार व वजन वाढते, या सर्व क्रियेत गारा काही सेमी ते काही फुट एवढ्या वजनाच्या तयार होतात, आता वजन पेलण्याची क्षमता न राहिल्याने गारा जमिनीवर येऊ लागतात, यालाच आपण गारपीट असे म्हणतो.

गारपीटीच्या घटना सर्वसाधारणपणे मॉन्सूनच्या सुरवातीला मार्च, एप्रिल महिन्यात घडतात कारण त्यावेळी अचानक वातावरण बदलण्यास बराच वाव असतो. गारापीट होण्यासाठी पृष्ठभागावरील तापमानातील बदल हे महत्वाचे कारण आहे, उन्हाळ्यात जमिनिवरील हवा तापल्याने व त्या मानाने तपांबरातील तापमान कमी असल्याने ही क्रिया वेगात घडते. जागतिक हवामान बदलाचा या घटनेवर खूप कमी परिणाम होतो कारण ही नैसर्गिक घटना आहे.

### शहाणा बोकड

प्राचीन काळी एकदा, एक गावातल्या सगळ्या बोकडांनी सभा भरवून खाटकांच्या हाती न सापडण्याची तजवीज कशी करावी, यासंबंधी विचार चालविला.

आपल्या मालकाचा डोळा चुकवून सर्वांनी पळून जावे, ही युक्ती सर्वानुमते पसंत ठरली व त्याच दिवशी अमलात आणावी असे ठरले.

ते ऐकून त्यातला एक म्हातारा शहाणा बोकड त्यास म्हणतो,

'अरे, तुम्ही हे लक्षात ठेवा की, आपण जरी पळून गेलो, तरी बोकडाच्या मांसाशिवाय लोक राहतील, ही गोष्ट शक्य नाही. शिवाय खाटीक लोक आपल्या कामात चांगले वाकबगार असल्यामुळे आमचा जीव घेताना ते आम्हांस फार वेळ धडपडत नाहीत, परंतु आपण एकदा येथून निघून रानावनातून हिंडू लागलो म्हणजे भलत्याच अडाणी लोकांच्या हाती सापडू ते आमचे हालहाल करून आम्हांस मारतील.'

हे ऐकताच बोकडांनी आपला ठराव रद्द केला आणि ते आपापल्या घरी गेले.

तात्पर्य : दु:ख टाळणे शक्य नसेल तर ते कमी कसे होईल हे पहावे.

## रहमते दर्शन (भाग - १)



महाराज कृपालसिंह जी स्वप्न में दर्शन दिये और बोले, तिलक नगर लंगर का प्रसाद खाओ। तुम ठीक हो जाओगी। वह लड़की लंगर में जाना नहीं चाहती थी, परन्तु उसको लंगर के प्रसाद से ही आराम आया

एक बार रात के समय सरदार बेअन्त सिंह जी ने कहा कि १५- २० आदमी आये हैं, उनके लिए लंगर बनाना है। मेरे साथ महाराज जी हमेशा सूक्ष्म रूप में रहते थे। उनकी दया से सारे कार्य अपने आप ही सम्पन्न हो जाते थे। यह काम भी बड़ी आसानी से निपट गया। जो लंगर बच जाता था उसे हम घरों और पाको में लोगों को बाँट देते थे।

इस प्रकार सत्संग का सिलसिला पार्कों में, रामलीला ग्राउंड, गाँधी ग्राउंड और परेड ग्राउंड में चलता रहा। महाराज जी की दया से सारा कार्य सुचारू रूप से चलता रहा और कहीं बाधा नहीं आई। इस प्रकार करते-करते हमें कृपाल आश्रम मिल गया, जहाँ सारी संगत अब प्रसन्न है।

### सारी सृष्टी मे उनसा कोई नहीं

### प्रारंभिक दिनों की याद

सन् १९८४ में मैं रेलवे पुलिस अम्बाला में कार्यरत था । मेरा जीवन बहुत सदाचारी नहीं था, परन्तु मुझमें चाह थी कि मुझे भी कोई गुरु मिले। उन दिनों मैं देखता था कि बहुत से लोग ब्यास में राधास्वामी सत्संग में जाते थे और चूँकि ब्यास अम्बाला से काफी नजदीक है, इसलिये मुझमें भी ब्यास जाकर सत्संग प्रवचन सुनने की इच्छा जागृत हुई। कई बार कोशिश की परन्तु निष्फल रहा। इस बीच मैंने रेलवे पुलिस की नौकरी छोड़कर साहिबाबाद (उ. प्रदेश) में एक विदेशी कंपनी में नौकरी कर ली। पर मेरे दिल में गुरु धारण करने की एक हूक सी लगी रहती थी। मैं निरंतर गुरु की खोज में इधर-उधर घूमता रहता था ।

१९८८ में एक दिन मुझे झिलमिल, दिल्ली में किन्हीं राम गोपाल जी के बारे में पता लगा कि उनके यहाँ सत्संग होता है और वे किसी गुरु के पास भी जाते हैं। मैं उनके पास पहुँचा। उन्होंने मेरा बड़ा मान-सम्मान किया और मुझसे सत्संग के बारे में विस्तार से चर्चा की। फिर वे मुझे एक दिन सत्संग के लिए कृपाल आश्रम में ले गये जहाँ महाराज दर्शनसिंह जी गद्दी नशीन थे। मैंने उनका सत्संग सुना और मेरी वर्षों की इच्छा पूरी हुई। अब मैंने पूर्ण रूप से अपने आपको गुरु चरणों में समर्पित कर दिया। शायद कोई प्रारब्ध कर्म ही मुझे गुरु के चरणों में ले गया और उनके चरणों में जाने के पश्चात उन्होंने मुझ पर भरपूर दया की। कुछ घटनायें हैं जो मेरे जीवन में घटीं और जिन्हें मैं भुला नहीं सकता।

सन् १९८८ की बात है । मेरा छोटा लड़का, जिसकी उम्र लगभग सात साल की थी, अचानक बीमार हो गया। उसे उल्टी और पेचिश इतनी अधिक थी कि उसकी हालत बिगडती चली गई और डॉक्टरी उपचार से भी कोई लाभ नहीं हुआ । इस प्रकार करते-करते रात के दो बज गये। मेरी पत्नी, संतोष शर्मा लंगर में सेवा करती है। उसे महाराज जी पर पूर्ण विश्वास है। जब मैं थक चुका तो उसने मुझे ढाड़स बँधाते हुए गुरु के रहमो करम पर बच्चे को छोड़ देने का आग्रह किया। उसने महाराज जी द्वारा दिया हुआ थोड़ा सा प्रसाद बच्चे के मुँह में डाल दिया और इसके साथ ही एक महान चमत्कार हुआ। बच्चे के उलटी-दस्त बंद हो गये।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

जरा सा काम करने से पसीना आना, कमर में कमजोरी वा दर्द होता है, आंखो के नीचे काले घेरे बन जाना, मांस पेशियों में खिंचाव, रक्त शर्करा में कमी है तो समझो एड्रिनल ग्रंथि सही कार्य नहीं कर रही।

यदि रोशनी सहन नहीं होती है, रात को देखने में परेशानी होती है तो समझो एड्रीनल ग्रंथि ठीक काम नहीं कर रही है। कम स्टेमना होना, तनाव होना, छोटी छोटी बातों में चिढ़ होना यह एड्रीनल ग्रंथि की कार्य करने की शक्ति पर बुरा असर होने की निशानी है इस चक्र के जागृत होने पर बलिष्टता बढ़ती है। आलस्य, प्रमाद, अवज्ञा, अविश्वास, अभिमान, ईर्ष्या, द्वेष आदि दुर्गण मिटते हैं आधार तथा स्वाधिष्टान चक्र एक समूह में आते हैं। इन का मिलन बिंदू रुद्र ग्रंथि कहलाता है। यह चक्र जीभ से भी जुड़ा हुआ है। जो कूछ हम खाते हैं उसका सीधा असर इस पर होता है। इस चक्र को जागृत करना चाहते हैं तो खाना धीरे धीरे और प्रत्येक ग्रास ३२ बार चबा चबा कर खाना चाहिये । खाते समय भगवान को याद करते रहो। सदा सात्विक भोजन खायें। यह चक्र चंद्रमा और बुध ग्रह की चुम्बकीय शक्ति से भी प्रभावित होता है।

### स्वाधिष्ठान चक्र

स्वाधिष्टान चक्र -२

ये चक्र ६ पंखड़ियों वाला है। अर्थात यहाँ से ६ नस नाड़ियां निकलती हैं। यह नाड़ीया सूक्ष्म हैं प्रकाश हैं जो दिखता नही ।

यह अवचेतन मन में स्थित भावनाओ से जुड़ा हुआ है। हमारे पिछले जन्मों के संस्कार स्वभाव जो आत्मा के अन्दर रेकोर्डिड हैं वह सब इस चक्र से जुड़े हुए हैं। ये चक्र उन्हे रीड करता है। इसे हम अवचेतन मन की फोल्डर कह सकते हैं जिस में तरह तरह की सूचनायें सुप्त अवस्था में पड़ी हैं। यह मूल आधार चक्र से भी सम्बन्ध रखता है। इस में सूक्ष्म रुप में संस्कार रहते हैं परंतु प्रकट मूल अधार चक्र में होते है। जैसे गीत संगीत या और कोई डाटा रहता पेन ड्राइव में है परंतु दिखता या प्रकट कंप्यूटर स्क्रीन पर होता है।

यह चक्र दूषित होता है तो अधिक मीठा, अधिक नमकीन खाने की इच्छा होती है। अल्कोहल पीने की तलब लग सकती है। इन भावनाओ को रोक नहीं पाते जब कि पता है ये नुकसान देने वाली हैं। इसी तरह कोई कोई कड़े संकल्प उठते हैं उन्हें हम रोक नहीं सकते आप और सोचते हैं एक बार कर लो फिर देखा जायेगा। जिसे हम कहते हैं विल पावर कमजोर है । मन पर काबू नहीं है। आप अपनी उम्र से अधिक नजर आते है या थोड़ी देर खड़े होते ही थकान होती है, के सिर में दर्द होने लगता है यह लक्षण इस चक्र की कमजोरी दर्शाते हैं। इसे दूर करने के लिये शक्ति वर्धक सात्विक भोजन और सात्विक विचारो पर ध्यान दें ।

ये मासिक धर्म तथा उस से सम्बन्धित अंगो को प्रभावित करता है। प्रजनन क्रिया तथा कुटुम्ब सम्बन्धित कल्पना आदि इसी चक्र में होती हैं। इस चक्र को आत्मा सामान बिंदू समझ कर मन में कहे आप शांत है शांत है तो यह चक्र जागृत होता है। तथा मन शांत, निर्मल और शुद्ध होता है। इस चक्र पर ध्यान लगाने से आन्तरिक शत्रुता, वासना, क्रोध, लालच आदि का नाश होता है ।

इस का संतुलन बिगड़ने से अवसाद, पीठ के निचले हिस्से में दर्द, अस्थमा, ऐलेरजी, फंगस, संक्रमण और कामशीलता के विकार पैदा होते हैं।

अगर यह केन्द्र तंदरुस्त हो तो जीवन में अमोद प्रमोद, मनोरंजन, घूमना फिरना और मौज मस्ती करने की प्रधानता होती है। इस के जागृत होने पर क्रूरता, गर्व, आलस्य, प्रमाद अवज्ञा आदि दुर्गुणों का नाश होता है।

जब ये चक्र कमजोर होता है तो मसालेदार भोजन अधिक पसंद आता है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदीय बालसंस्कार

व जन्मानंतर त्याला उबदार कुशीमध्ये असते व जन्मानंतर त्याला उबदार वातावरणाची गरज असते. अशा अवस्थेत बाळाला कपडे घातले नाहीत, तर बाळाला थंडी वाजते, म्हणून बाळाला नवीन कपडे घालावयाचे नसतील, तर कोणत्याही जवळच्या नातेवाइकांच्या बाळाचे कपडे स्वच्छ धुऊन डेटॉलच्या पाण्यामध्ये स्वच्छ पिळून सुकवावेत व नंतर इस्त्री करून ते बाळासाठी वापरावेत.

आधुनिक काळात काही स्त्रिया बाळाचे शूचे कपडे वारंवार बदलावे लागू नयेत, म्हणून डायपर लावतात. वारंवार डायपर वापरल्यामुळे व नैसर्गिक हवा न मिळाल्यामुळे तो भाग ओलसर राहतो. त्या ठिकाणी बाळाला पुरळ येऊन जंतुसंसर्ग होण्याची भीती असते. त्याकरिता स्वच्छ, सुती लंगोट वापरावेत. डायपरचा वापर फक्त गरजेपुरताच, बाहेर जाताना काही तासांसाठी करावा.

**बाळाची सुखकारक निद्रा :** नवजात बाळ सुरुवातीला एक ते दीड महिना साधारणत: २०-२२ तास झोपते. बाळ जन्म घेताना जवळ जवळ झोपेत किंवा अर्ध निद्रेमध्ये जन्म घेते.

### नवजात बाळाची काळजी कशी घ्यावी?

बाळ दीड ते दोन महिन्यांचे होईपर्यंत शी-शू करताना व भूक लागली असता जागे होते व नंतर लगेचच झोपते. दूध पिताना, अंघोळ करताना, कपडे बदलताना, ओले झालेले कपडे बदलताना, थोडा वेळ ते खेळले, जागे राहिले, तर ते प्राकृत आहे, असे समजावे. यापेक्षा जास्त वेळ जागे राहिले, रडले तर बाळाला भूक लागली आहे, असे समजावे. बाळाला आईचे दूध व्यवस्थित प्रमाणामध्ये मिळत असेल, तर ते रडत नाही. लहान बाळाला आईजवळ झोपवावे, त्यामुळे बाळाला सुरक्षित वाटते व ते रडत नाही व आईला देखील बाळाच्या हालचालींवर लक्ष ठेवता येते. आईजवळ झोपवले तरी बाळाचे अंथरूण हे वेगळे असावे. बाळाचे अंथरूण सुती, स्वच्छ व मऊ असावे. बाळाच्या अंथरुणावर मुंग्या, डास व इतर कीटक नाहीत ना, याची खात्री करून घ्यावी. बाळाची झोपायची जागा उबदार व शांत असावी. बाळाला झोपेतून विनाकारण उठवू नये. बाळ-बाळंतणीच्या खोलीतील वातावरण कीटकविरहित, जास्त आवाज येणार नाही असे समशीतोष्ण, सुरक्षित व शांत असावे. झोपलेल्या बाळाची श्वासाची क्रिया मंद असते.

अशा वेळी त्याचे ज्ञानतंतू व मस्तिष्क पूर्णपणे आराम करीत असते, त्यामुळे बाळाच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी निद्रा आवश्यक असते. झोपेतून उठल्यावर जर बाळ हसत-हसत उठले, तर त्याला पुरेशी झोप मिळाली आहे, असे समजावे आणि जर बाळ रडत उठले, तर त्याला पुरेशी झोप मिळाली नाही, असे समजावे. बाळाला झोपेतून विनाकारण उठवू नये. जसजसे बाळ मोठे होईल, तसतसे त्याचे झोपेचे प्रमाण कमी होत जाते व खेळण्याचे प्रमाण वाढते. बाळाच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी आहाराइतकीच निद्रा महत्त्वाची असते, त्यामुळे बाळ जेवढ्या शांतपणे गाढ झोपेल, तेवढे त्याचे आरोग्य सुधारेल. निरोगी बाळाच्या झोपेची गरज त्याच्या वयावर, आजूबाजूचे वातावरण व व्यक्तिगत स्वतःच्या प्रकृतीवर अवलंबून असते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# दि अंबिका महिला बँकेची आर्थिक वर्षातील उच्चांकी व्यवसाय वाढ


सौ. भारती आठरे


सौ. शोभा खरपुडे


प्रा. मेधाताई काळे

नगर - सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षा अखेरीस दि अंबिका महिला बँकेच्या एकुण व्यवसायामध्ये १७.१९% वाढ होवून एकुण व्यवसाय १८९.३५ कोटीचा झालेला आहे. तसेच या आर्थिक वर्षात बँकेस सर्व तरतुदी वजा जाता निव्वळ नफा रू. १ कोटी १९ लाख झालेला आहे. या वर्षातील सर्वोत्तम कामगिरीबद्दलची माहिती अध्यक्षा सौ. भारती आठरे यांनी दिली.

आर्थिक वर्षा अखेर बँकेच्या एकूण ठेवी रू. १११.९६ कोटी असून कर्ज वितरण रू. ७७.३७ कोटी आहेत. गतवर्षीच्या तुलनेत बँकेच्या ठेवीमध्ये १२.६३ कोटी रू. आणि कर्जामध्ये १५.१३ कोटी रू. वाढ झालेली आहे. बँकेचे वसुल भागभांडवल रू. ३.१७ कोटी असून खेळते भांडवल रू. १३१.६४ कोटी रू. आहे. बँकेची एकुण गुंतवणुक ४५.२९ कोटी रू. असून त्या पैकी २९.७० कोटी रू. सरकारी कर्जरोखे गुंतवणूक आहे. वसुल भांडवल पर्याप्तता २३.१५%, नक्त एन. पी. ए. ०.०% टक्के, नियमित लेखापरिक्षण वर्ग 'अ', रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे फायनान्शिअल साउंड अ‍ॅण्ड वेल मॅनेजमेंटचे (FSWM) चे सर्व निकष बँक पुर्ण करत आहे. या सर्व बाबी बँकेची अहवाल सालातील प्रगती दर्शवितात. सभासदांच्या, खातेदार यांचे क्रियाशील सहकार्यामुळे बँकेला हे यश मिळालेले आहे.

बँकेच्या एकुण ५ शाखा असुन ग्राहक बँकिंग सेवेचा लाभ घेत आहेत. बँकेने ग्राहकांसाठी मोबाईल बँकींग, फोन पे, गुगल पे, यु.पी.आय., ए.टी.एम. व अन्य डिजिटल सेवा सुरू केलेली आहे तसेच नुकतेच बँकेने ठेवीवरील व कर्जाचे व्याजदर संतुलित केले असुन सोनेतारण कर्जमर्यादा वाढविली आहे यांचा सर्व ग्राहकांनी लाभ घ्यावा असे आवाहन उपाध्यक्षा सौ. शोभा खरपुडे यांनी केले आहे.

यावेळी बोलताना संस्थापिका प्रा. मेधाताई काळे म्हणाल्या की, 'कस्टमर रिस्क, कॅश व्यवहारावरील मर्यादा, उत्पन्न कर प्रणाली, ऑनलाईन व्यवहार व त्यामधील धोके, मुदत संपलेल्या ठेवीचे वेळेत नुतनीकरण व एकुण बँक प्रणाली बाबत सभासद, खातेदार यांनी जागरूक राहणे आवश्यक आहे यासाठी बँक प्रयत्न करत आहे.' तसेच रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्व व Money Laundering Act 2002 या कायद्यातील तरतुदीनुसार बँकांनी सर्व ग्राहकांची ओळख पटवून घेणे कायद्याने बंधनकारक आहे. केवळ नवीन खातेदारांपुरतीच ही बाब बंधनकारक नसून बँकेत चालू असलेल्या सर्व जुन्या खातेदारांकडून ठराविक कालावधी नंतर नव्याने के.वाय.सी करणे अनिवार्य आहे त्यांची खातेदारांनी पुर्तता करावी.'

बँकेस सन २०२४ मध्ये बँकिंग क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक फेडरेशन लि., मुंबई यांचा महाराष्ट्र राज्यातील महिला बँक गटातून सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार २०२४ व अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनच्यावतीने उत्कृष्ट काम करून नक्त एन.पी.ए ०% टक्के राखल्याबद्दल BINGS Award (Best performance in NPA Management, Growth and Services Award) तर कार्यक्षम प्रशासनाबद्दल BITS हा दुसरा पुरस्कार मिळालेला आहे. बँकेस आत्तापर्यंत राज्यस्तरीय एकूण अकरा व नॅशनल पातळीवरील एक असे एकूण १२ सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार मिळालेले आहेत. या यशामध्ये प्रा.डॉ. संध्या जाधव, सौ. आशा मिस्कीन, सौ. सुमन गोसावी, सौ. शांता मोरे, अ‍ॅड. सौ. शारदा लगड, सौ. सरोजनी चव्हाण, सौ. सविता गांगर्डे, सौ. शोभना चव्हाण, अ‍ॅड. सौ. विजया काकडे, तज्ञ संचालक सी.ए. ज्ञानेश्वर काळे, रमेश परभणे, माजी संचालिका डॉ. क्रांती अनभुले, दिवगंत संस्थापक संचालिका, माजी अध्यक्षा प्रा. पुष्पा मरकड, प्रा. पुष्पलता वाघ, मुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश गायकवाड व सर्व अधिकारी कर्मचारी वर्ग यांचे योगदान आहे.

## मंथन प्रज्ञाशोध परिक्षेत सविता रमेश फिरोदिया प्रशालेचा विद्यार्थी शेख सैफ राज्यात दुसरा



नगर - मंथन प्रज्ञाशोध परीक्षा २०२५ यांच्या मार्फत घेतल्या जाणाऱ्या प्रज्ञाशोध परीक्षेत सविता रमेश फिरोदिया प्रशालेतील विद्यार्थी शेख सैफ आसिफ राज्यात दुसरा आला असून एकूण २८ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत.

राज्यात दुसरा आलेला शेख सैफ हा इयत्ता दुसरीचा विद्यार्थी असून तसेच इ.दुसरी मधील कार्तिक सुरेश घोलप जिल्ह्यात ३ रा, अर्णव मनोजकुमार खंडागळे, धनश्री विकास पाचारणे, पुष्कराज किरण गायकवाड हे जिल्ह्यात चौथे आले असून तर इ.७ वीतील ओम श्रीराम मंडलीक जिल्ह्यात दुसरा आला आहे.

सर्व गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे शिशु संगोपन संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हा. चेअरमन दशरथ खोसे, सेक्रेटरी र.धों. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, खजिनदार अ‍ॅड. विजय मुनोत, विनोदकुमार कटारिया तसेच सर्व विश्वस्त, संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापिका सौ. योगिता गांधी व सर्व शिक्षकवृंद, पालक यांनी अभिनंदन केले.

# एकाही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होवू देणार नाही

### काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनच्या विश्वस्तांची ग्वाही

नगर - काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनच्या बोल्हेगाव फाटा येथील शैक्षणिक संकुलात १७ एप्रिल रोजी जागेबाबत सुरू असलेल्या कायदेशीर प्रक्रियेमुळे करण्यात आलेल्या कारवाईच्या घटनेमुळे विद्यार्थी, पालक आणि स्टाफमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या घटनेदरम्यान कॅम्पसमध्ये गोंधळ निर्माण होवून चुकीच्या अफवा पसरल्या गेल्या. विशेषत: विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. मात्र व्यवस्थापन याबाबत सकारात्मक दृष्टीने मार्ग काढत असून एकाही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होवू दिले जाणार नसल्याची ग्वाही काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनच्या विश्वस्त डॉ.दिप्ती म्हस्के - ठाकरे यांनी दिली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या परीक्षा वेळेत आणि सुरळीतपणे पार पडल्या जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


काकासाहेब म्हस्के शैक्षणिक संकुलाच्या सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बैठक नगरमध्ये पार पडली.

काकासाहेब म्हस्के शैक्षणिक संकुलाच्या सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बैठक १९ एप्रिल रोजी नगरमध्ये पार पडली. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर्किटेक्ट समीर ठाकरे, मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ.विवेक रेगे, उपप्राचार्या डॉ.पुनम गायकवाड, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ.संदीप बडधे, पार्वतीबाई म्हस्के नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य अजित चवरदार, प्रा.डॉ.निलिमा भोज, प्रा.नितीन ठुबे यांच्यासह संस्थेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

डॉ.म्हस्के-ठाकरे पुढे म्हणाल्या की, महाविद्यालयाच्या आवारात घडलेल्या घटनेबाबत तातडीने संबंधित विद्यापीठांना कल्पना दिली गेली असून त्यांनी परिस्थिती समजून घेत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये या दृष्टीने सहकार्याची भावना दर्शविली आहे, त्याबद्दल आम्ही त्यांचे धन्यवाद व्यक्त करतो. आगामी परिक्षांबाबत पर्यायी परिक्षा केंद्र विद्यापीठांनी उपलब्ध करुन दिल्याने परिक्षा व्यवस्थितपणे व ठरलेल्या वेळेत पार पडणार आहेत. तसेच निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत लवकरच सकारात्मक मार्ग काढुन विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाच्या दृष्टीने योग्य ती तरतूद विश्वस्त आणि प्रशासन करीत आहे. त्यामुळे पालकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याबाबत काळजी करु नये आम्ही सक्षमपणे आणि समर्थपणे परिस्थिती हाताळत आहोत. वास्तविक, दोन दिवसांनंतर आम्ही आमची भुमिका मांडली याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो, मात्र फार्मसीच्या विद्यार्थ्यांच्या सोमवारपासून सुरु होणाऱ्या परिक्षांच्या दृष्टीने पर्यायी केंद्र उपलब्ध करुन प्राधान्याने यातून मार्ग काढण्यात आम्ही व्यस्त होतो असे त्या म्हणाल्या. या संकटकाळात विद्यार्थी, पालक आणि स्टाफने केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी आभार मानले.

यात्प्रसंगी प्राचार्य डॉ.रेगे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या आड कोणतीही गोष्ट येणार नाही याची व्यवस्थापन आणि स्टाफ काळजी घेत असून विद्यापीठाच्या परिक्षा मे आणि जूनमध्ये पार पडणार असून आपल्या विद्यार्थ्यांचे परिक्षा केंद्र हे दरवर्षी दुसऱ्या कॉलेजमध्ये असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या परीक्षा वेळेत पार पडतील. तसेच विद्यार्थ्यांना काही शैक्षणिकदृष्ट्या शंका असतील तर आपापल्या विषयाच्या शिक्षकांच्या संपर्कात राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ.बडधे म्हणाले की, डी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांची २१ एप्रिलपासून प्रॅक्टिकल परीक्षा सुरु होणार असून त्यासाठी विद्यापीठाने पर्यायी परिक्षा केंद्र उपलब्ध करून दिले असून त्याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली आहे. तसेच मे महिन्यात होणाऱ्या लेखी परीक्षांबाबतही विद्यापीठ सकारात्मक दृष्टीने सहकार्य करणार असल्याने विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन डॉ.बडधे यांनी केले आहे.

नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ.चवरदार म्हणाले की, नर्सिंगच्या विद्यार्थ्यांची सध्या कोणतीही परीक्षा नाही, तोपर्यंत व्यवस्थापन निर्माण झालेल्या समस्येवर निश्चितपणे मार्ग काढेल. विद्यार्थ्यांचे लेक्चर हे थोड्या कालावधीसाठी ऑनलाईन माध्यमातून होणार असल्याने विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होवू दिले जाणार नाही. त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांनी चिंता न करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

### सीईओ ठाकरेंच्या भाषणावेळी कर्मचारी गहिवरले

महाविद्यालयात घडलेल्या घटनेनंतर संस्थेचे सीईओ समीर ठाकरे यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बैठक घेत मनमोकळेपणाने प्रश्न विचारण्याचे आवाहन केले. यावेळी अनेक कर्मचाऱ्यांनी विद्यार्थी आणि स्टाफला कॉलेज कॅम्पस खाली करताना अश्रू अनावर झाल्याचे सांगत पुढे काय आणि कसे होणार हा प्रश्न तर मनात आहेच, मात्र या संस्थेशी कौटुंबिक नातं तयार झालं असल्याचे म्हणाले. यावेळी सीईओ ठाकरे यांनी विद्यार्थी आणि स्टाफवर कोणताही अन्याय होवू दिला जाणार नसल्याचे सांगत एकाही कर्मचाऱ्याचे काम बंद होणार नाही. तसेच त्यांचे कोणतेही आर्थिक नुकसान होवू दिले जाणार नाही याची ग्वाही दिली. वाद हा जागेबाबत असून कॉलेज किंवा संस्थेबाबत नसल्याचे स्पष्ट करत विश्वस्त डॉ.अभितेज म्हस्के आणि विश्वस्त, प्रशासन आम्ही तज्ञांचे मार्गदर्शन घेत तोडगा काढत आहोत. या कठीण काळातही सर्वांनी एकजूट दाखवून पाठबळ दिल्याने आभार व्यक्त केले. आपले कुटुंब एकसंध राहणार असून लवकरच या परिस्थितीतून सर्वांच्या सहकार्याने मार्ग काढणार असल्याचे सीईओ ठाकरे यांनी सांगितले. यावेळी अनेक कर्मचारी गहिवरल्याचे पहावयास मिळाले.

## श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, सावेडी येथील ४२ विद्यार्थ्यांचे हेडगेवार प्रतिष्ठान, प्रज्ञाशोध, मंथन व विविध स्पर्धा परीक्षेत यश

नगर - यंदा शाळेचे तथा संस्थेचे नाव या ४२ विद्यार्थांनी जसे मोठे केले तसेच पुढील वर्षी १४२ मुलांनी प्रशालेचे व संस्थेचे नाव जगभरात खूप मोठे करावे, असे प्रतिपादन श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव तथा शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर यांनी केले.



श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला प्राथमिक विभाग सावेडीच्या तब्बल ४२ विद्यार्थ्यांनी हेडगेवार प्रतिष्ठान, प्रज्ञाशोध, मंथन व विविध स्पर्धा परीक्षेत प्रशालेचे नाव उज्वल केल्याबद्दल विद्यार्थ्यांच्या कौतुक सोहळा प्रसंगी शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर, श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सदस्य स्वप्निल कुलकर्णी, प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर व शिक्षकवृंद, विद्यार्थी आदी. (छाया - उदय जोशी)

सर्व गुणवंत व प्रज्ञावंत विद्यार्थ्यांच्या कौतुक सोहळा प्रसंगी क्षीरसागर बोलत होते. श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव व प्राथमिक विभागाचे शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सदस्य स्वप्निल कुलकर्णी, प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

हे युग स्पर्धेचे आहे, अशा कौतुक सोहळ्यातून मुलांच्या पाठीवर पडलेली शाबासकीची थाप आगामी काळात प्रेरणा देण्यास पोषक ठरते. पालकांनीदेखील उत्साही असणे महत्वाचे आहे. पालक व शिक्षकांनी मुलांवर घेतलेली ही मेहनत संस्थेसाठी नक्कीच भूषणावह ठरेल व भविष्यात देखील अशीच कामगिरी नोंदवत पालकांचे, शिक्षकांचे, शाळेचे व पर्यायाने संस्थेचे नाव उंचावत रहा असे मनोगत क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर यांनी प्रास्ताविकातून आपल्या भावना मांडल्या. हा सोहळा पहाण्यासाठी सर्व शिक्षकांचे डोळे आतुरले होते. विद्यार्थांनी भरघोस असे यश संपादन करून प्रशालेचे नाव खरोखरच समर्थ विद्यामंदिर असे सार्थ ठरविले. आईवडिलांच्या कष्टाची अशीच कायम जाणीव ठेवा व पालकांनी देखील आपल्या मुलांवर सतत विश्वास ठेवा. व ध्येयवेडे व्हा. अशा शुभेच्छा त्यांनी सर्वांना दिल्या.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. संगीतशिक्षिका सौ.वर्षा खणकर व विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. पालकांमधून सौ. अर्चना दळवी व सौ. भंडारी यांनी आपल्या मनोगतातून अभिनंदन केले व हे शिक्षकांच्या मेहनतीने यश आहे, संस्था सतत मुलांच्या कलागुणांना वाव देते, असे त्या म्हणाल्या व सर्वांना पुढील वाटचालसाठी शुभेच्छा दिल्या.

यात्प्रसंगी सर्व ४२ विद्यार्थ्यांसह त्यांचे मार्गदर्शक शिक्षक भगवान जाधव, गणेश पारधे, श्रीमती अश्विनी जाधव, सौ.पूजा खटावकर, सौ.वृषाली कुलकर्णी, श्रीमती संपदा नगरकर, श्रीमती प्रियंका कासार, सौ. प्राची देशमुख व सौ. अंजली देशपांडे यांचे देखील विशेष कौतुक केले गेले. शिक्षक तसेच सर्व गुणवंत विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली. यादीवाचन श्रीमती संपदा नगरकर यांनी केले. गणेश पारधे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन सौ. प्राची देशमुख व सौ. अंजली देशपांडे यांनी केले.


फकिरवाडा येथील यशवंत गाडे विद्यालयात आयोजित स्नेहमेळाव्यात माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करताना रामचंद्र दिघे, माजी नगरसेवक योगिराज गाडे, सुर्यकांत गाडे आदी.

## माजी विद्यार्थ्यांनी स्नेहमेळाव्यात जागवल्या शाळेच्या जुन्या आठवणी

### शाळेला मदत करण्याचे दिले आश्वासन

नगर - (फकिरवाडा) मुकुंदनगर येथील यशवंत गाडे विद्यालयात नुकताच माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत शाळेला आर्थिक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

या मेळाव्यासाठी विद्यालयातील माजी विद्यार्थी राज्यभरातुन उपस्थित होते. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त रामचंद्र दिघे होते. यावेळी माजी नगरसेवक योगिराज गाडे, ज्येष्ठ उद्योजक सुर्यकांत गाडे उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत आपल्या भावना व्यक्त केल्या. माजी नगरसेवक योगिराज गाडे म्हणाले की, शालेय जीवन हा आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असतो. ज्या शाळेमुळे मुले विविध पदावर कार्यरत आहेत त्या शाळेबद्दल नेहमी कृतज्ञतेचा भाव दाखववा. मेळाव्यासाठी चेतन शहाणे, डॉ. इम्रान शेख, काविश सय्यद, राजश्री सोनार, गणेश सुपेकर, सागर रासकर, उद्धव गाडे, कैलास गाडे, डॉ.पायल कटारिया, डॉ.सुप्रिया कटारिया, सुरभी बदलवा, सविता शिंदे आदि उपस्थित होते. आदिनाथ लवांडे यांनी स्वागत केले. मुख्याध्यापिका संगिता बनकर यांनी प्रास्ताविक तर मनिषा मगर यांनी सुत्रसंचालन केले. योगेश गुंड यांनी आभार मानले.

## केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी नगरमध्ये 'वेलनेस सेंटर' सुरू करण्यात यावे

### खासदार निलेश लंके यांच्याकडे संतोष यादव यांची मागणी

नगर - केंद्रीय कर्मचारी यांच्यासाठी 'सीजीएचएस'चे 'वेलनेस सेंटर' (केंद्रीय स्वास्थ्य योजना) अहिल्यानगर-मध्ये सुरू करावे अशी मागणी पोस्टल संघटनेचे महाराष्ट्र व गोवा राज्याचे कार्याध्यक्ष संतोष यादव यांनी खासदार निलेश लंके यांचेकडे केली.



खासदार निलेश लंके यांच्याशी वेलनेस सेन्टर विषयी चर्चा करताना पोस्टल संघटनेचे राज्याचे कार्याध्यक्ष संतोष यादव.

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये केंद्र सरकार आस्थापनेचे विविध कार्यालये असून त्यामध्ये मोठ्या संख्येने केंद्रीय कर्मचारी कार्यरत आहेत, सेवानिवृत्त कर्मचारी यांची संख्या ही मोठी आहे. या सर्वाकरिता CGHS वेलनेस सेंटर अहिल्यानगर कार्यान्वित झाल्यास या सुविधेचा लाभ केंद्रीय कर्मचारी यांना होऊ शकतो. सध्या अहिल्यानगर-मधील काही सेवानिवृत्त कर्मचारी सुविधेचा लाभ पुणे येथील वेलनेस सेंटरमधून घेत आहेत. मागील दोन वर्षांपूर्वी श्री छत्रपती संभाजीनगरमध्ये वेलनेस सेंटर कार्यान्वित झालेले आहे.

याविषयी पोस्टल संघटनेचे नेते संतोष यादव यांनी खासदार निलेश लंके यांच्याशी चर्चा करत, सर्व बाबी त्यांच्याकडे ठेवण्यात आल्या असून, आपल्या माध्यमातून याविषयी पाठपुरावा करावा अशी मागणी करण्यात आली. खासदार निलेश लंके यांनी लवकरच योग्य स्तरावर पाठपुरावा केला जाईल असे आश्वासन दिले. यावेळी संदीप कोकाटे, कमलेश मिरगणे, नितीन थोरवे, नामदेव डेंगळे, सुनिल थोरात, राजमोहंमद शेख यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

## महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिरमध्ये माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

नगर - येथील नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिरमध्ये २००५ ते २०२० या वर्षांतील विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा नुकताच आयोजित करण्यात आला होता. आपले शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून व्यावसायिक व कौटुंबिक जीवनात स्थिरता लाभल्यानंतरही अनेक विद्यार्थ्यांना आपल्या शाळेची ओढ स्वस्थ बसू देत नाही. शालेय वयातील मित्र-मैत्रिणी, त्यांच्यासोबत व्यतीत केलेला रम्यकाळ आणि अनेकानेक आठवणी अनेकदा मनाला सुखद गारवा प्राप्त करून देतात. याच ओढीतून या विद्यार्थ्यांनी या मेळाव्याचे आयोजन केले होते.


महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिरमध्ये २००५ ते २०२० या वर्षांतील विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळाव्यामध्ये सहभागी झालेले माजी विद्यार्थी.

वर्षानुवर्षे कानात गुंजणारा शाळेच्या घंटेचा मंगलमय आवाज, शालेय नित्य प्रार्थना, हजेरी, शिक्षकांचे अध्यापन, वर्गातील खोड्या आणि अगदी हातावर मिळणारा छडीचा प्रसाद या सर्वच अनुभवांची यानिमित्त शाळेमध्ये पुनरावृत्ती करण्यात आली. शालेय तासिकेनंतर विद्यार्थ्यांनी आपला सध्याचा परिचय आणि कार्यक्षेत्राची ओळख करून दिली. शाळेप्रती आदर आणि शालेय आठवणींना उजाळा देताना अनेकांना शब्द सुचेनासे झाले होते. आवडत्या शिक्षक-शिक्षिकांसोबत बोलण्यात, फोटोसेशन करण्यात दिवस कधी संपला ते समजलेच नाही. शाळा-शिक्षकांप्रती स्नेहभाव अर्पण करत व शाळेला भेटवस्तू देत जड अंतकरणाने अनेकांनी शाळेचा निरोप घेतला.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विभावरी रोकडे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत व मेळाव्याचे प्रास्ताविक केले.

शिक्षकांच्या वतीने प्रशांत कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले.

गणेश उघडे यांनी सूत्रसंचालन केले. स्नेह मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी राहुल पाटोळे, शिवम पालवे, शुभम दातरंगे, नेहा खोमणे, मयुरी दोंता तसेच विद्यालयातील शिक्षक शिक्षकांनी परिश्रम घेतले.



अहमदनगर पहिली मंडळी येथे ईस्टर सण आनंदात साजरा करण्यात आला.

# पहिली मंडळी चर्चमध्ये 'ईस्टर' आनंदात साजरा

## येशूचे पुनरुत्थान मानवाच्या उद्धारासाठीच : रेव्ह अभिजीत तूपसुंदरे

नगर – प्रभु येशू ख्रिस्ताचे कृसावरील मरण व मरणावर विजयी होवून तिसऱ्या दिवशी पुन्हा जिवंत होणे म्हणजे येशू ख्रिस्ताचे पुनरुत्थान. येशू ख्रिस्ताने मरणावर विजय मिळविला हे दैवी सत्य आहे. येशू ख्रिस्त आजही जिवंत आहे व तो संपूर्ण मानव जातीचे कल्याण करणार आहे. तेव्हा प्रत्येकाने आपले जीवन पवित्र बायबलमध्ये दिलेल्या नितीतत्वाप्रमाणे जगणे आवश्यक आहे, असे मौलिक विचार रेव्ह अभिजीत तूपसुंदरे यांनी आपल्या भक्ती संदेशातून दिले.

अहमदनगर पहिली मंडळी (सी.एन.आय.) चर्चमध्ये इस्टर संडे निमित्त विशेष भक्तीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी रेव्ह अभिजीत तूपसुंदरे यांनी विशेष भक्ती संदेश दिला. सूत्र संचालन रेव्ह. राज कुमारी सिंग यांनी केले

सकाळी महिला मंडळांने सूर्योदयापूर्वीची उपासना चर्च परिसरामध्ये आयोजित केली होती. पहाटे सर्व महिला मंडळ एकत्र येऊन प्रभू उठला आहे, खरोखर उठला आहे, अशा घोषणा देऊन उपासना केली. हे सर्व कार्यक्रम यशस्वी पार पाडण्याकरीता चर्चचे धर्मगुरु रेव्ह राज कुमारी सिंग, रेव्ह अभिजीत तूपसूंदरे, सचिव सतिश मिसाळ, उपसचिव प्रितम जाधव, खजिनदार डॉ. संजय लाड, उपखजिनदार सॅम्युएल बोर्डे, कार्यक्रम समिती अध्यक्ष प्रसन्ना शिंदे, प्रा. विनीत गायकवाड, रविद्रं लोंढे, सुनित ढगे, अमोल लोंढे, कुमार हर्षल पाटोळे, सौ. शोभना गायकवाड, सौ. वंदना शिंदे, सौ. कांदबरी सुर्यवंशी, सौ. शशिकला साळुंके, श्रीमती स्नेहल साळवे या कमिटी सदस्यांनी परिश्रम घेतले.

# आधुनिक शेती आणि इतर क्षेत्रात ड्रोन काळाची गरज बनले

## छायाताई फिरोदिया यांचे प्रतिपादन; युवक-युवतींच्या करिअरला टेक-ऑफ देणारी ड्रोन कार्यशाळा, विद्यार्थ्यांचा सहभाग; उड्डाणापासून निर्मितीपर्यंत मिळणार प्रशिक्षण

नगर – विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात कौशल्य मिळवले तर त्याच क्षेत्रात करिअर घडू शकते. ड्रोन हे केवळ छंद नसून उत्पन्नाचे साधन ठरू शकते. आधुनिक शेती आणि इतर क्षेत्रात ड्रोन काळाची गरज बनले असल्याचे छायाताई फिरोदिया यांनी स्पष्ट केले.





अहिल्यानगर शहरात अहमदनगर एज्युकेशन सोसायटी व सेरेब्रोस्पार्क इनोव्हेशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने ड्रोन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम या एकदिवसीय कार्यशाळेला संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया उपस्थित होत्या.

अहिल्यानगर शहरात अहमदनगर एज्युकेशन सोसायटी व सेरेब्रोस्पार्क इनोव्हेशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने ड्रोन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलच्या सभागृहात आयोजित या एकदिवसीय कार्यशाळेला युवक, युवती, शिक्षक, पालक व शेतकऱ्यांचा प्रतिसाद लाभला.

कार्यशाळेचे उद्घाटन सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सल्लागार सदस्य भूषण भंडारी, राजेश कुलकर्णी, ड्रोन मार्गदर्शक गणेश थोरात, मिहीर केदार, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक उल्हास दुगड, अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, रुपीबाई बोरा हायस्कूलचे मुख्याध्यापक अजय बारगळ, अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य संदीप उबाळे, सेनापती बापट विद्यालय (पारनेर) मुख्याध्यापक संतोष कुलकर्णी, भिंगार हायस्कूलचे मुख्याध्यापक रावसाहेब कासार, साईनाथ विद्यालय (शिर्डी) मुख्याध्यापक अभिमन्यू डुबल आदींसह युवक-विद्यार्थी व पालक वर्ग आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

गणेश थोरात यांनी सांगितले की, गावागावात ड्रोन पोहचविण्याची चळवळ सुरु आहे. विद्यार्थ्यांना ड्रोन बनवणे, त्याचे भाग, तांत्रिक बाबी आणि ड्रोन उडविण्याचे संपूर्ण प्रशिक्षण दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

भूषण भंडारी यांनी प्रशिक्षणाचे नियम व कायदेशीर बाबी स्पष्ट करत सांगितले, ड्रोन प्रशिक्षण आणि अधिकृत लायसन्सशिवाय ड्रोन उडविणे नियमबाह्य आहे. त्यामुळे सर्वांनी अधिकृत प्रशिक्षणच घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेत उपस्थितांना ड्रोनच्या मूलभूत रचनेपासून ते त्याचे उड्डाण कसे करावे याचे सखोल प्रशिक्षण व्याख्यान व प्रात्यक्षिकाद्वारे देण्यात आले. विविध प्रकारच्या ड्रोनची माहिती देताना, त्यांच्या कृषी, औद्योगिक, आपत्कालीन सेवा, फिल्मनिर्मिती, सुरक्षा आणि नकाशे बनवणे अशा विविध उपयोगांवर प्रकाश टाकण्यात आला. फोन ड्रोन कॅमेरा, त्यातील व्हिडिओ क्षमता, लाईव्ह ट्रान्समिशन, अडथळे ओळखण्याचे तंत्रज्ञान याविषयीही तपशीलवार माहिती दिली गेली. कार्यशाळेच्या शेवटी ड्रोन उडविण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तर शेतामध्ये औषध फवारणी करण्यासाठी वापरले जाणाऱ्या ड्रोनचे देखील उड्डाण करुन फवारणीचे प्रात्यक्षिक दाखवले.

सूत्रसंचालन अनिता जाधव यांनी केले. पाहुण्यांचा परिचय मेघा जोशी यांनी केला. गायत्री रायपेल्ली यांनी आभार मानले. अधिक माहितीसाठी सोमनाथ नजान ८६००००९५६६ व संकेत क्षेत्रे ९८८१५११३६६.

# २३ एप्रिलला होणाऱ्या जैन अल्पसंख्याक महासंमेलनासाठी आयोजन समितीची बैठक उत्साहात

नगर – श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स, नवी दिल्ली – चतुर्थ झोन आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व जैन संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित होणाऱ्या जैन अल्पसंख्याक महासंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी २० एप्रिल रोजी आनंद समवशरण, आनंदधाम, धार्मिक परीक्षा बोर्ड, अहिल्यानगर येथे आयोजन समितीची बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीला जिल्ह्यातील विविध जैन संघटना, श्रावक संघ, जैन सोशल फेडरेशन, महावीर प्रतिष्ठान, जितो, सक्रीय सामाजिक संस्था यांचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत राष्ट्रीय मंत्री वसंत लोढा व राजेंद्र बलदोटा यांनी महासंमेलनाच्या तयारीची माहिती देताना सांगितले की, संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातून जैन बांधवांमध्ये प्रतिसाद मिळत असून पाथर्डी, शेवगाव, राहाता, वांबोरी, राहुरी, अश्वी संगमनेर, श्रीरामपूर, श्रीगोंदा, कर्जत, मिरजगाव त्याच प्रमाणे टाकली ढोकेश्वर पारनेर या भागांतून संघटनांचे अध्यक्ष आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत मोठ्या प्रमाणावर जनजागृती सुरू केली आहे. स्थानिक पातळीवर वाहनांची व्यवस्था करून २३ एप्रिल रोजी आनंदधाम येथे होणाऱ्या महासंमेलनास सकाळी १० ते १ या वेळेत जैन समाजबांधव बंधू भगिनी या संमेलनात सहभागी होतील, याचे नियोजन सुरू आहे. या महासंमेलनास एकूण २ ते २.५ हजारांची उपस्थिती असण्याबाबत ही त्यांनी सांगितले आणि त्याप्रमाणे सर्व नियोजन सुरू असल्याबद्दल सर्व उपस्थितांना कळविले.

यावेळी अखिल भारतीय जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय समन्वयक ईश्वर बोरा यांनी विचार मांडताना सांगितले की, हे महासंमेलन केवळ एक कार्यक्रम नसून, जैन समाजाच्या हक्कांचे आणि अस्तित्वाचे भान समाजबांधवांपर्यंत पोहोचवणारी एक प्रभावी जनजागृती चळवळ आहे. शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि कायदेशीर बाबींमध्ये अल्पसंख्याक जैन समाजासाठी असलेल्या योजना समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्याचे हे महत्त्वाचे पाऊल आहे. प्रत्येकाने १० घरांशी संपर्क साधण्याचे अभियान राबवले पाहिजे, आणि यशस्वी आयोजनासाठी कार्यविभागणी करून नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्यास समाजात एक नवा विश्वास निर्माण होईल.

जैन समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत अल्पसंख्याक दर्जाचे फायदे आणि लाभ पोहोचावेत, या दृष्टिकोनातून जैन समाजातील सर्व बांधव-भगिनींनी या महासंमेलनात सहभागी व्हावे, असे आवाहन पेमराज बोंथरा यांनी आपल्या संबोधनात केले.

महासंमेलनात महाराष्ट्र शासनाच्या जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ना. ललित गांधी व अखिल भारतीय जैन कॉन्फरन्स – अल्पसंख्याक योजना विभागाचे कांतिकुमार जैन मार्गदर्शन करणार आहेत.

महासंमेलनात खालील शासकीय योजनांची माहिती दिली जाणार आहे आणि त्या योजनांचे फॉर्मही वाटण्यात येणार आहेत: विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, महिला व युवकांसाठी स्वयंरोजगार कर्ज योजना, व्यवसायासाठी अनुदान व कर्ज, प्रधानमंत्री आवास योजना, कौशल्य विकास योजना, प्राचीन तीर्थ व ग्रंथांचे संरक्षण, जैन पाठशाळांसाठी सहाय्य योजना, परदेशी शिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज, संमेलनात सहभागी होण्यासाठी लाभार्थ्यांनी आवश्यक शैक्षणिक, आर्थिक व ओळखपत्रे सोबत आणावीत, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले.

या बैठकीत महासंमेलनाचे यशस्वी आयोजन व्हावे यासाठी प्रत्येकाने प्रामाणिकपणे सहभाग घेण्याचे ठरवले. संपूर्ण जैन समाज एकवटल्यास आपले अधिकार अधिक प्रभावीपणे मांडता येतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या बैठकीत बडीसाजन श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, सतीश (बाबूशेठ) लोढा, अनिल कटारिया, पीयूष लुंकड, नितीन पटवा, ईश्वर अशोक (बाबूशेठ) बोरा, राजेंद्र बलदोटा, संतोष गांधी, रोशन चोरडिया, सुनील मालू, कुणाल भंडारी, चेतन मेहता, महावीर बडजाते, आगरकरमळा श्रावक संघाचे अध्यक्ष अभय कोठारी, केडगाव श्रीसंघाचे कमलेश गुंदेचा, अतुल शिंगवी, राजेश भाटिया, सी ए अभय कटारिया, उमेश बोरा, महावीर प्रतिष्ठानचे हर्षल बोरा, जितोचे संगीता मुथीयान, चेतन भंडारी, सरोज कटारिया, नूतन गांधी, लता कटारिया, अपेक्षा संकलेचा, प्रतिभा गांधी, शोभा गांधी, सोनाली डुंगरवाल, शुभा बोरा, गणेश कांकरिया, किशोर गांधी, संकल्प ग्रुपच्या वैशाली चोपडा, मनीषा मुनोत, भरत बागरेचा आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन जैन कॉन्फरन्सचे चतुर्थ झोनचे राजेंद्र बलदोटा यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष गांधी यांनी केले.

### सहभागी व्हा : जय आनंद महावीर युवक मंडळाचे आवाहन

या महासंमेलनास शहरासह जिल्ह्यातील जैन समाजातील बंधू-भगिनींनी उपस्थित रहावे, असे आवाहन जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, सेक्रेटरी आनंद मुथा व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# गीता परिवाराच्यावतीने ६ ते १५ मे या कालाधीत १ ली ते ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी बाल संस्कार वर्ग

नगर – श्रीराम मंदिर अयोध्याचे कोषाध्यक्ष गुरुगोविंद गिरी महाराज यांच्या प्रेरणेने ४० वर्षांपूर्वी संगमनेरमध्ये गीता परिवाराची स्थापना झाली. त्यानंतर डॉ. संजय मालपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली देशात व देशाबाहेर ही गीता परिवाराचे कार्य चालू आहे. या अंतर्गत भारतीय संस्कृतीचे मूल्य हे जर लहान मुलांमध्ये आली तर ते भारताचे भविष्य घडवू शकतात या विचाराने लहान मुलांसाठी संस्कार शिबिराचे आयोजन, ऑनलाईन भगवद्गीता असे बरेच उपक्रम आयोजित केले जातात. दरवर्षी मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांचा बालसंस्कार वर्गाला प्रतिसाद पाहून यावर्षी ८ केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे, विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापासून जवळ असणाऱ्या केंद्रावर सहभाग नोंदवता येईल त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ व खर्चही वाचणार आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्याने प्रवेश दिला जाणार आहे मर्यादित जागा शिल्लक आहेत. पालकांनी आपल्या मुलांना वर्गात प्रवेश घेऊन या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गीता परिवार अहिल्यानगर दक्षिणच्या जिल्हाध्यक्ष सौ. सुनंदा रविंद्र सोमाणी, उपाध्यक्ष सौ.प्रतिभा बजाज, सेक्रेटरी सोमनाथ नजान, कोषाध्यक्ष सौ.अलका नावंदर व सर्व कार्यकर्त्यांनी केले आहे.

बाल संस्कार वर्ग – कालावधी : ६ ते १५ मे. वेळ : सकाळी ९ ते ११. वयोमर्यादा : ९ ते १५ वर्षे (४ थी ते ९ वी)

केंद्र – (आपल्या जवळच्या केंद्रावर प्रवेश घेऊ शकता) १) इचरजबाई फिरोदिया प्रशाळा, नवी पेठ, २) रामकृष्ण इंग्लिश मीडियम स्कूल, भवानीनगर, ३) मुरलीधर सारडा विद्यार्थी भवन, तारकपुर बस स्टँडच्या मागे, ४) आनंद विद्यालय गुलमोहर रोड, सावेडी, ५) ऐश्वर्या हॉल, श्रीराम चौक, ६) लक्ष्मीनारायण मंदिर, कायनेटिक चौक, ७) विठ्ठल मंदिर, शेंगा गल्ली, ८) विनायकनगर (लेडीज हॉल) अशा एकूण ८ केंद्रावर एकाच वेळी हे संस्कार वर्ग चालवले जाणार आहेत.

आनंद विद्यालय, गुलमोहर रोड येथे संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत लहान मुलांसाठी (पहिली ते तिसरी) एक केंद्र चालवले जाईल. अधिक माहितीसाठी संपर्क– ९८९०१०७४०४ किंवा ७५८८१२४४९१.




केडगाव भूषणनगर या ठिकाणी शिवसेना (शिंदे गट) संपर्कप्रमुख दिलीप सातपुते मित्र मंडळाच्या वतीने श्रीकृष्ण लीला कथा वाचन महाराष्ट्रातील वैराग्यमूर्ती केशव महाराज उखळीकर यांच्या सुश्राव्यवाणीतून हा कार्यक्रम होणार आहे. मंडप उभारणीच्या भूमिपूजनाचा शुभारंभ पार पडला. (छाया – प्रसाद शिंदे)

# केडगाव, भूषणनगर येथे २६ एप्रिल ते ९ मे दरम्यान श्रीकृष्ण लीला कथा वाचन कार्यक्रम

### मंडप उभारणीच्या कामाचा शुभारंभ

नगर – केडगाव, भूषणनगर या ठिकाणी शिवसेना संपर्कप्रमुख दिलीप सातपुते मित्र मंडळाच्यावतीने श्रीकृष्ण लीला कथा वाचन महाराष्ट्रातील वैराग्यमूर्ती केशव महाराज उखळीकर यांच्या सुश्राव्यवाणीतून हा कार्यक्रम होणार आहे. २६ एप्रिल ते ९ मे या कालावधीत सायंकाळी ६ ते ९ या वेळेमध्ये हा कार्यक्रम पार पडणार असून दररोज महाआरतीनंतर महाप्रसादाचा देखील वाटप होणार आहे.

या कार्यक्रमाच्या मंडप उभारणीच्या भूमिपूजनाचा शुभारंभ पार पडला. यावेळी ह.भ.प. शिर्के महाराज, माऊली महाराज सातपुते, घोडके गुरुजी, ह.भ.प. जाधव, महाराज ह.भ.प. तांदळे महाराज, रामेश्वर भोकर, प्रतीक्षा कोरगावकर, धनश्री शिंदे, डॉक्टर चेमटे, राजू भंडारी, अभय विभूते, अशोक लाटे, ओंकार सातपुते उपस्थित होते.

यावेळी दिलीप सातपुते म्हणाले की, कथा वाचन हा केवळ एक धार्मिक कार्यक्रम नाही, तर तो एक अध्यात्मिक प्रवास आहे. या कथांमधून आपल्याला नीतिमूल्यं, भक्तीचा अर्थ, आणि जीवनातील अडचणींवर मात करण्याची प्रेरणा मिळते. श्रीकृष्णांनी गीतेत सांगितलेली कर्मयोगाची शिकवण आजही प्रत्येकासाठी उपयुक्त आहे. या कार्यक्रमामुळे आपल्याला आपल्या परंपरांशी नाते जपता येते, तसेच नव्या पिढीलाही आपल्या संस्कृतीची ओळख करून देता येते. याउद्देशानेच केडगाव, उपनगरासह अहिल्यानगर शहरातील नागरिकांना श्रीकृष्ण लीला कथा वाचनातून प्रभू श्रीकृष्ण काय होते हे कळवे म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# 'न्याय वैद्यक शास्त्र'वर ॲड.सतिशचंद्र सुद्रिक यांचे नगर शहरात व्याख्यान

नगर – अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज आणि रूग्णालय, मनमाड रोड, सावेडी येथे ॲड. सतिशचंद्र सुद्रिक यांचे न्याय वैद्यक शास्त्र या विषयावर वैद्यकिय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान झाले. प्राचार्य डॉ. सुनिल पवार यांनी व्याख्यानासाठी आमंत्रित केले होते.




व्याख्यानात ॲड. सुद्रिक यांनी विस्तृतपणे बर्न, स्ट्रॅन्ग्यूलेशन, हॅगींग, पॉयझनिंग, थ्रोटलिंग, ड्रॉऊनिंग, ड्रायड्राऊनिंग, प्युट्रिफिकेशन, डिकॉम्पोझीशन, मृत्युचा वेळ, मृत्युपुर्व जबाब नोंदताना डॉक्टरची कर्तव्य इ. विषयांवर कथन केले. वरील गोष्टींचा विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यात कायमस्वरूपी उपयोग होईल, तसेच रूग्णाचा केस पेपर हा नेहमी काळजीपुर्वक तयार करावा. कारण एखादा रूग्ण न्यायालयात अथवा ग्राहकमंचात डॉक्टरांच्या विरोधात गेल्यास तोच केस पेपर त्यांना वाचवू शकतो, केस पेपर व्यवस्थित नसेल तर वकीलही डॉक्टरांना मदत करू शकत नाहीत.


तसेच संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष न्यायालयात कामकाज पाहण्यास पाठविणे, तसेच शवविच्छेदन करतानाचे निरीक्षण करण्यास पाठवणे तसेच नाशिक येथील प्रयोगशाळेतील रासायनिक पृथक्करण कसे करतात याचे निरीक्षणासाठी पाठवतात याबद्दल ॲड. सुद्रिक यांनी समाधान व्यक्त केले व भविष्यामध्ये परिपुर्ण डॉक्टर कसे होतील या बद्दल संस्था घेत असलेल्या परिश्रमाबद्दल कौतुक केले.

# निमगाव वाघात २२ एप्रिलला श्री बिरोबा महाराज यात्रोत्सव

## २३ एप्रिल रोजी कुस्ती हगामा तर २४ एप्रिल रोजी रंगणार बैलगाडा शर्यत

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथील ग्रामदैवत श्री बिरोबा महाराजांच्या यात्रा उत्सवानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २२ एप्रिल रोजी गावात यात्रा उत्सव व २३ एप्रिल रोजी कुस्त्यांचा हगामा रंगणार असून, संध्याकाळी करिमशहा वली बाबांचा संदल-उरुस होणार आहे. तर यावर्षीचे विशेष आकर्षण २४ एप्रिल रोजी बैलगाडा शर्यत होणार असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी दिली.






नुकतेच गावातील युवकांनी गंगाजल आणण्यासाठी १८ एप्रिल रोजी रात्री पारंपारिक वाद्यांसह मिरवणूकीने कावड घेऊन प्रवरा संगमकडे प्रस्थान केले. गावातील युवकांचा जथ्था कावडी घेवून मंगळवारी यात्रेच्या दिवशी सकाळी ८ वा. गावात परतणार असून, उत्साहात कावडीची गावामधून डफ, ढोल, ताशे व लेझीम पथकासह मिरवणूक काढली जाणार आहे. सकाळी १० वाजता श्रीबिरोबा महाराजांच्या मूर्तीस गंगाजलाने अभिषेक घालून विधीवत पूजा केली जाणार आहे. सालाबाद प्रमाणे होणाऱ्या यात्रोत्सवानिमित्त जिल्ह्यातील भाविक दर्शनासाठी येत असतात. यानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, रात्री ९ वाजता छबीना मिरवणूक काढली जाणार आहे. मिरवणुकीच्या समाप्तीनंतर नर्गिस पुणेकर यांचा आर्केस्ट्राचा कार्यक्रम होणार आहे.

यात्रेनिमित्त गावातील बिरोबा मंदिराला रंगरंगोटी करुन, आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी गावात कुस्त्यांचे मैदान रंगणार आहे. तर संध्याकाळी करिमशहा वली बाबांचा संदल-उरुस होणार आहे. गावातील यात्रा व संदल-उरुसच्या कार्यक्रमातून धार्मिक एकतेचे दर्शन घडणार आहे. गुरुवारी होणारी बैलगाडा शर्यत या यात्रा उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरणार आहे.

या कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील ग्रामस्थांना उपस्थित राहण्याचे आवाहन सरपंच लताबाई फलके, उपसरपंच किरण जाधव, देवाचे भगत नामदेव भुसारे, नाना डोंगरे, बाबा जाधव, अनशाबापू शिंदे, बाबा पुंड, बबन कापसे, रामदास वाखारे, सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब जाधव, व्हाईस चेअरमन जालिंदर आतकर, अतुल फलके, पांडूरंग गुंजाळ, संजय डोंगरे, ठकाराम शिंदे, अंबादास निकम, मेजर शिवाजी पुंड, संदीप डोंगरे, भानुदास ठोकळ, डॉ. विजय जाधव, वसंत फलके, अनिल डोंगरे, संजय कापसे, गुलाब केदार, वैभव फलके, भरत फलके, अण्णा जाधव, साहेबराव बोडखे, गोकुळ जाधव, राजू शेख, दिलावर शेख, आदम शेख आदींनी केले आहे. यात्रा उत्सव व संदल-उरुस यशस्वी करण्यासाठी गावातील ग्रामस्थ परिश्रम घेत आहे.

# रत्न, ज्योतिष व वास्तू सल्लागार डॉ.गोपाळकृष्ण रत्नपारखी यांची नगरमध्ये २७ एप्रिल रोजी 'रत्नशास्त्र कार्यशाळा'

नगर – येथील १९८५ पासुन कार्यरत असलेले ज्येष्ठ रत्न, ज्योतिष व वास्तू सल्लागार डॉ. गोपाळकृष्ण रत्नपारखी यांची रत्नशास्त्र कार्यशाळा २७ एप्रिलला सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत प्रोफेसर चौकामधील हॉटेल रोज गोल्ड (ब्रम्हभोज) येथे आयोजित करण्यात आली आहे.



श्री सह्याद्री अस्ट्रॉलॉजिकल रिसर्च सेंटर आणि श्रीराम ज्योतिष कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत रत्नांचा उपयोग कसा होतो? रत्नाचा भविष्याशी संबंध काय? रत्न कोणी धारण करावे? रत्न कसे असावे? कोणती रत्ने एकाच वेळी धारण करू नयेत? रत्नाचे आयुष्य, रत्नाचे प्रकार, रत्न परिक्षण, महारत्ने, माणिक, मोती, प्रवाळ, पुष्कराज, पाचू, हिरा, निलम, गोमेद, वैडुर्य (लसण्या), रत्नांच्या प्रजाती याविषयी शास्त्रोक्त माहिती सप्रात्यक्षिक दिली जाणार असुन लाखो रुपये क़िमती चे रत्न प्रत्यक्ष निरीक्षणेसाठी ठेवले जाणार आहेत.

कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या सर्वांना समारंभपूर्वक प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी प्रवेश मर्यादित आहे.

नाव नोंदणी करण्यासाठी आयोजक सौ.शितल देशमुख (८९९९०९६५८७/ ९९६०६४४३४३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन श्रीराम ज्योतिष कार्यालयाने केले आहे.

# घरफोडी करणाऱ्या दोन अल्पवयीन मुलांना पकडले; ३ लाख ९२ हजारांचे सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत

नगर - शहरातील तोफखाना परिसरातील एका घरातून भरदिवसा दोघा अल्पवयीन मुलांनी ९७ ग्रॅम वजनाचे ३ लाख ९२ हजारांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना १९ एप्रिल रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ या कालावधीत घडली. या प्रकरणी गुन्हा दाखल होताच तोफखाना पोलिसांनी तत्काळ तपास करत चोरी करणाऱ्या दोघा अल्पवयीन मुलांना पकडले असून त्यांच्या कडून चोरीतील दागिने हस्तगत केले आहेत.



तोफखाना परिसरात घरफोडी करणाऱ्या २ अल्पवयीन मुलांना पकडून त्यांच्याकडून हस्तगत केलेल्या दागिन्यांसह तोफखाना पोलिसांचे पथक.

याबाबत अजय हर्षकांत सासवडकर (वय ३२, रा. विठ्ठल मंदिरामागे, तोफखाना) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी सासवडकर हे १९ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता त्यांच्या वडीलांच्या औषधोपाचरासाठी घराला कुलुप लावुन बाहेरगावी गेले. दुपारी ३ वाजता ते परत घरी आले असता त्यांना त्यांच्या दरवाज्याला लावलेले कुलुप अर्धवट तुटलेले दिसले. त्यांनी घरामध्ये जाऊन पाहणी केली असता कपाटामधील सोन्या-चांदीचे ९७ ग्रॅम वजनाचे दागिने चोरीला गेल्याचे लक्षात आले. याबाबत त्यांनी तोफखाना पोलिसांना माहिती दिली. तसेच २० एप्रिल रोजी फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३), ३०५ (अ) प्रमाणे अन्वये गुन्हा दाखल केला.

तोफखाना पोलिसांनी घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या आदेशानुसार गुन्हे शोध पथकाचे उपनिरीक्षक शैलेश पाटील यांनी पथकासह तात्काळ घटना पाहणी केली. सदरचा गुन्हा अल्पवयीन मुलांनी केल्याची गोपनीय माहिती मिळताच सध्या वेशातील पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत त्यांच्या पालकांसमोर त्यांच्याकडे कसून चौकशी केली. त्यावेळी त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. तसेच त्यांनी घरात लपवून ठेवलेले दागिने काढून दिले.

पोलिसांनी ते ३ लाख ९२ हजार रुपये किंमतीचे दागिने हस्तगत केले आहेत. पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील, पो.हे.कॉ. सुनिल शिरसाठ, सुनिल चव्हाण, भानुदास खेडकर, योगेश चव्हाण, अहमद इनामदार, वसिमखान पठाण, सुरज वाबळे, सुधीर खाडे, पो.कॉ. सुमित गवळी, सुजय हिवाळे, सतिष त्रिभुवन, बाळासाहेब भापसे, सतिष भवर, महेश पाखरे, सागर साबळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# ई ऑफीस प्रणालीमुळे महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजात गतिमानता

## फेसबुक, इंस्टाग्रामच्या माध्यमातून आलेल्या तक्रारींवर कार्यवाही, नागरी सुविधाही ऑनलाईन सुरू होणार

नगर - महानगरपालिकेने गेल्या दोन महिन्यांपासून प्रशासकीय कामकाजासाठी ई ऑफीस प्रणालीचा वापर सुरू केला आहे. बहुतांशी कामकाज, प्रस्ताव, पत्रव्यवहार या प्रणालीद्वारे सुरू आहे. त्यातून कामकाजात गतिमानता येत आहे. पेपरलेस वर्कमुळे पर्यावरणाचेही रक्षण होण्यास मदत होत आहे. एप्रिल महिन्यापासून संपूर्ण कामकाज या प्रणालीद्वारे करण्यात येत आहे. लवकरच नागरी सुविधा, तक्रारीसाठीही ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यातून नागरिकांचा वेळही वाचेल व तक्रारींचा वेळेत निपटारा होईल, असा विश्वास आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी व्यक्त केला.

यशवंत डांगे यांनी सांगितले की, अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत ई-ऑफिस प्रणाली यशस्वीरित्या कार्यान्वित केली आहे. या प्रणालीमुळे महापालिकेतील प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ, पारदर्शक आणि गतिमान झाले आहे. यामध्ये दस्तऐवजांची देवाणघेवाण, फायलींचे ट्रॅकिंग, निर्णय प्रक्रियेतील गती आणि जबाबदारी यामध्ये लक्षणीय सुधारणा झालेली आहे. या उपक्रमामुळे कागदांचा वापर कमी झाला असून, ही प्रणाली पर्यावरणपूरक ठरली आहे. वेळेची बचत, कार्यक्षम संवाद आणि फायलींवरील नियंत्रण वाढल्याने प्रशासनाची कार्यशैली अधिक परिणामकारक झाली आहे.

सर्व विभागप्रमुखांना दिवसभरात आलेल्या फायली त्याचदिवशी संध्याकाळी निकाली काढणे, मंजुरी देणे, आवश्यक कार्यवाही करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामध्ये हलगर्जीपणा झाल्यास कारवाई केली जात आहे. प्रशासनाचा कारभार नागरिकाभिमुख असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने लवकरच नागरिकांच्या तक्रारी, सूचना व विविध सुविधा ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्याचे नियोजन सुरू आहे. सध्या, महानगरपालिकेच्या अधिकृत अचउ छअत्रअठ या फेसबुक व इन्स्टाग्राम पेजवर नागरिकांनी नोंदवलेल्या तक्रारींची दखल घेऊन त्यावर कार्यवाही केली जात आहे. आता नागरिकांचे काम अधिक सोयीस्कर, सुखकर होण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने १००% डिजिटल प्रणालीचा वापर सुरू करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या दिशेने प्रक्रिया सुरू आहे, असेही यशवंत डांगे यांनी सांगितले.

# चितळे रोडवर व्यावसायिकावर धारदार शस्त्राने खुनी हल्ला

## मारहाणीत तिघे जखमी, ७ जणांवर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल

नगर - मागील भांडणाच्या मनात राग धरून ६ ते ७ जणांच्या टोळक्याने टेलर व्यावसायिकास लोखंडी गज, लाकडी दांडके, धारदार शस्त्राने बेदम मारहाण करुन त्यांच्या खुनाचा प्रयत्न केल्याची घटना शहरातील चितळे रोड येथील मिरावली दर्गा समोर १९ एप्रिल रोजी रात्री ९ च्या सुमारास घडली. या मारहाणीत व्यावसायिकासह त्याचा मुलगा व पुतण्या असे तिघे जखमी झाले आहेत.

याबाबत शंकर रामचंद्र नल्ला (वय ६०, रा नवरंग व्यायाम शाळेजवळ, तोफखाना) यांनी २० एप्रिल रोजी दुपारी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. फिर्यादी यांचे त्यांच्या घरासमोर राहणारा ऋषीकेश रंगा व त्याचा मेव्हणा सागर अभिजीत आडसुळ यांच्याशी ६ महीन्यापूर्वी वाद झाले होते. त्या वादाचा मनात राग धरुन सागर आडसुळ याने त्याच्या मोटारसायकलच्या डिक्कीतून चाकू काढून दाखवुन दमदाटी केली होती. त्यानंतर १९ एप्रिल रोजी रात्री ९ च्या सुमारास फिर्यादी नल्ला हे त्यांच्या एस वाय टेलर, मिरावली दर्गासमोर दुकानात बसलेले असताना सागर आडसुळ, ऋषीकेश रंगा, अभिजित आडसुळ व त्यांच्यासोबत इतर अनोळखी चार इसम आले व त्यांनी लाकडी दंडुके, गज काठी व हातातील धारदार शस्त्राने मारहाण केली.

त्यावेळी नल्ला यांनी आरडाओरडा केला असता पुतण्या प्रसाद व मुलगा समर्थ यांनी सोडवण्याचा प्रयत्न केला असता त्यांना सुध्दा लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीत समर्थला दोन्ही हातावर, पाठीवर, व डोक्यावर मारहाण झाल्याने तो जखमी होउन जागेवरच पडला व त्याचवेळी फिर्यादी यांच्या डोक्यात सागर आडसुळ याने धारदार शस्त्राने वार केला असता डोक्यातून रक्त येऊ लागल्याने व गंभीर दुखापत झाल्याने नल्ला जमीनीवर कोसळून बेशुद्ध झाले. या गोंधळात त्यांच्या गळ्यातील पाच तोळ्यांची सोन्याची चेन कोठेतरी गहाळ झाली. त्यानंतर मारहाण करणारे तेथून निघून गेले.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात शंकर नल्ला यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सागर आडसुळ, ऋषीकेश रंगा, अभिजित आडसुळ व इतर चार अनोळखी इसमाविरुद्ध भा. न्या. सं.२०२३ चे कलम १०९, ११५ (२), १८९ (४),१९१ (३),१९०, ३५१(३) प्रमाणे खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला.

# पोलिसासाठी लाच घेताना शिक्षकाला रंगेहात पकडले

## नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई, २ लाखाची होती मागणी

नगर - सुगंधी तंबाखूच्या छाप्यातील कारवाई सौम्य करण्यासाठी सहायक पोलीस निरीक्षकासाठी दीड लाख रुपये स्वीकारून उर्वरित रक्कमेच्या तडजोडी अंती ३० हजार रुपये स्वीकारल्याप्रकरणी मध्यस्थी करणाऱ्यास शिक्षकास नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २० एप्रिल रोजी रंगेहाथ पकडले आहे. विजय बाबासाहेब गर्जे (वय ४८, रा. पाथर्डी) असे या आरोपी शिक्षकाचे नाव आहे.

याबाबतची माहिती अशी की, यातील तक्रारदार हे त्यांचे भावासह पान टपरी व शेतीचा व्यवसाय करतात. ४ एप्रिलला पाथर्डी पोलिसांनी तक्रारदार यांचे राहते घराच्या बाजूला असलेल्या पत्राच्या शेडमध्ये छापा टाकून त्या ठिकाणी असलेली सुगंधी तंबाखू, सुपारी व मावा तयार करण्याचे साहित्य जप्त केले होते. सदरची कारवाई सुरू असताना तक्रारदार यांना त्यांचे ओळखीचे इसमाने शिक्षक विजय गर्जे यांना भेटण्यास सांगितले. तक्रारदार हे गर्जे यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना म्हटले की तुझ्या भावावर मोठ्या कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करावयाचा नसेल आणि तुला तपासात मदत हवी असेल तर तुला सहाय्यक पोलिस निरीक्षक यांचे करिता २ लाख रुपये द्यावे लागतील.

त्यावेळी तक्रारदारांनी गर्जे यांच्या ओळखीचा इसमाच्या मोबाईलवर ऑनलाइन पद्धतीने स्वतःच्या अकाउंट वरून ५० हजार रुपये व नातेवाईकांच्या अकाउंटवरून १ लाख रुपये असे दीड लाख रुपये पाठवले होते. त्यानंतर १५ एप्रिल रोजी तक्रारदार यांनी गर्जे यांना फोन करून भावाचे अटकपूर्व जामीन संबंधित विचारले असता त्यांनी सहाय्यक पोलिस निरीक्षक यांना उर्वरित ५० हजार रुपये देऊन टाका व विषय मिटवून टाका असे म्हटले आणि जर तुम्ही पैसे नाही दिले तर ते तुमच्या भावाच्या अटकपूर्व जामीन मंजूर होऊ देणार नाहीत व त्याला अटक करतील असे बोलले. तक्रारदार यांची अजून लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी नगरच्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे पोलिस अधिकारी व आरोपी विजय गर्जे यांच्याविरुद्ध लाच मागणीबाबत तक्रार नोंदवलेली होती.

या तक्रारीच्या अनुषंगाने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पंचासमक्ष केलेल्या पडताळणीमध्ये गर्जे यांनी तडजोडीअंती ३० हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले. ही रक्कम २० एप्रिल रोजी पंचासमक्ष स्वीकारताना त्यास रंगेहात पकडले. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलिस उप अधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजू आल्हाट, पोलीस अंमलदार संतोष शिंदे, रविंद्र निमसे, बाबासाहेब कराड, चंद्रकांत काळे, विजय गंगुल, चालक पो.हे.कॉ.दशरथ लाड यांनी केली, त्यांना पोलीस अंमलदार उमेश मोरे, गजानन गायकवाड, सचिन सुद्रुक, चालक पो.हे.कॉ.हारुण शेख यांनी सहाय्य केले.

# अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी रोकडोबा मंदिरात हनुमान चालीसा पठण व महाआरती

नगर - विधान परिषेदेचे माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, या भावनेतून भिंगार वासियांच्या वतीने रोकडोबा मंदिर येथे भक्तिभावाने हनुमान चालीसा पठण आणि महाआरतीचा कार्यक्रम झाला. या वेळी नागरिकांनी उपस्थित राहून सामूहिक प्रार्थनेत सहभाग घेतला. त्यानंतर उपस्थित नागरिकांनी संपूर्ण श्रद्धेने हनुमान चालीसेचे सामूहिक पठण केले. या पठणानंतर मंदिरात महाआरती करण्यात आली. 'जय हनुमान ज्ञान गुणसागर' च्या जयघोषात वातावरण भक्तिमय झाले होते.



अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी रोकडोबा मंदिर येथे हनुमान चालीसा पठण आणि महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. शेजारील छायाचित्रात रोकडोबाची मूर्ती. (छाया - लहू दळवी)

यावेळी बोलताना संजय सपकाळ म्हणाले की, काका हे जनतेच्या मनात घर करून बसलेले लोकनेते आहेत. त्यांनी अनेक वर्षे भिंगारसह शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अथक प्रयत्न केले आहेत. आज त्यांच्या आरोग्यासाठी आम्ही संपूर्ण समाजबांधवांसह प्रार्थना करत आहोत. अनेक महिला भगिनीनीही भजन व स्त्रोत्र म्हणत आपल्या भावना व्यक्त केल्या. महाआरती नंतर सामूहिक प्रार्थना करत काकांच्या आरोग्यासाठी हनुमानजीच्या चरणी साकडे घालण्यात आले. कार्यक्रम हा केवळ भक्तिभावाने भरलेला नव्हता, तर समाजाच्या एकतेचे, प्रेमाचे आणि लोकनेत्याच्या आरोग्याबाबतच्या काळजी आणि सदिच्छांचा प्रतीक ठरला.



अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी सिव्हिल हडको जैनस्थानक येथे नवकार मंत्राचा सामूहिक जप करण्यात आला. (छाया - लहू दळवी)

# अरुणकाका जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी सिव्हिल हडको जैनस्थानक येथे नवकार मंत्राचा सामूहिक जप

नगर - माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी सिव्हिल हडको परिसरातील जैन स्थानक येथे श्रावक संघाच्या वतीने नवकार मंत्राचा सामूहिक जप करण्यात आला. तसेच आरोग्यासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. या धार्मिक कार्यक्रमात समाजातील नागरिक उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येऊन भक्तिभावाने नवकार मंत्राचा जप केला. या मंत्रजपामधून सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन, काका यांना लवकर बरे वाटावे, अशी भावना प्रत्येकाच्या मनात होती. श्रावक संघाचे पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

यावेळी बोलताना संघाचे विजय गुगळे म्हणाले की, काका हे केवळ एक राजकीय व्यक्तिमत्त्व नसून, समाजाच्या सर्वच स्तरांमध्ये आपुलकीने व सन्मानाने पाहिले जाणारे नेतृत्व आहे. त्यांच्या आरोग्यासाठी आम्ही नवकर मंत्राचा जप केला आहे. नवकार मंत्र जपाच्या दरम्यान संपूर्ण स्थानक परिसर पवित्रतेने भरून गेला होता. शांततेत, अनुशासनात आणि एकाग्रतेत पार पडलेला हा कार्यक्रम भाविकांच्या मनाला भावून गेला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी एकत्र येऊन सामूहिक प्रार्थना केली आणि काका यांना उत्तम आरोग्य प्राप्त होवो, अशी सदिच्छा व्यक्त केली.

यावेळी माजी नगरसेवक संजय चोपडा, विजय गुगळे, गणेश गांधी, राजेंद्र बोगावत, प्रकाशलाल मुथा, अनिल चंगेडिया, हेमराज गांधी, वैजनाथ हळदगुणे, सुरेशलाल लोढा, नेनसुख कटारिया, विजय मुथीयान, सुहास मेहता, प्रकाश सुरपुरिया, शिरीष खिंवसरा, अशोक चोपडा, जयश्री चेंगडिया, निर्मला ओस्तवाल, कांता शिंगवी, लताबाई कटारिया, शामा कटारिया, पद्माबाई गुगळे, सरलाबाई लोढा, सरला मुथीयान, कुसुबाई देसरडा, ज्योती मोथीयान, वसंताबाई लुंकड, अलका गुगळे आदि उपस्थित होते. काका यांच्या आरोग्यासाठी केलेली ही प्रार्थना समाजातील एकतेचे व सहवेदनेचे प्रतीक ठरली.

# केडगाव देवी मंदिर परिसरात ३ ठिकाणी चोऱ्या; गुन्हा दाखल

(पान १ वरुन)

६५ ग्रॅमच्या चांदीच्या वस्तू, ५ हजारांची रोकड असा २९ हजारांचा ऐवज लंपास केला. तसेच भताने यांच्या शेजारी कॉलनीत राहणारे विष्णु गणपत गाडेकर (वय ६५, रा. एकता कॉलनी) यांनी सांगितले की, त्यांचे राहते घराच्या दरवाजाचे लॉक तोडून आत प्रवेश करुन बेडरुम मधील लोखंडी कपाटातून २ हजार रुपये किमतीचे १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे हळदी कुंकवाचे तबक, ५०० रुपये किमतीचे २० ग्रॅम वजनाचे चांदीचे मोदक, २०० रुपये किमतीचे १० ग्रॅम वजनाचे पायातील जोडवे असा २ हजार ७०० रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेला.

तसेच संजय हणमंत जगदाळे (वय ३८, रा. शिवाय बंगला, धनश्री कॉलनी, केडगाव देवीरोड) यांचे घरी १९ एप्रिल रोजी पहाटे ३ ते ४ वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचा कोयंडा कटरच्या सहाय्याने तोडून आत प्रवेश करुन बैठक हॉलमधील देवघराचे तसेच बेडरुम, पहिल्या मजल्यावरील बेडरुम मधील सामानांची उचकापाचक करुन घरातील स्मार्ट वॉच व इतर २ साधे घड्याळ, एम आय कंपनीचे साउंड बार, मलेशियन देशाच्या विविध दराच्या चलनी नोटा. ३ हजार ५०० रुपये किमतीचा किरकोळ रकमेचा गल्ला, ४ हजार रुपये किमतीची १ लक्ष्मी मातेची चांदीची मुर्ती, व चांदीचे २ कॉईन, चांदीचे पंचपाळ असा १४हजार रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेला. या प्रकरणी संगिता भताने यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध भा. न्या. सं. २०२३ चे कलम ३०५ (अ), ३३१ (३) (४) प्रमाणे घरफोडी चोरीचा गुन्हा दाखल केला.



अरुण जगताप यांच्या स्वास्थ्यासाठी पुणे येथील गुरुद्वाऱ्यात प्रार्थना करण्यात आली. यावेळी उपस्थित असलेले आमदार संग्राम जगताप, सुहास टिंगरे, जनक आहुजा, प्रितपालसिंह धुप्पड, मुन्ना जग्गी, प्रदीप धुप्पड आदी.

# अरुण जगताप यांच्या स्वास्थ्यासाठी पुणे येथील गुरुद्वारामध्ये 'अरदास'

नगर - माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी २० एप्रिल रोजी पुणे कॅम्प येथील गुरुसिंग सभा गुरुद्वारा (हॉलीवुड) येथे अरदास (प्रार्थना) करण्यात आली.

काका यांच्यावर पुणे येथील खाजगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून, ते आजारातून बरे होण्यासाठी गुरुद्वाऱ्यात अरदास करण्यात आले. तर सामुदायिकपणे अरुणकाकांच्या दिर्घायुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली. यावेळी आमदार संग्राम जगताप, सुहास टिंगरे, जनक आहुजा, प्रितपालसिंह धुप्पड, मुन्ना जग्गी, प्रदीप धुप्पड, टोनी मक्कर, गणेश विधे, गुरुद्वाऱ्याचे विश्वस्त सरदार बेदी आदी उपस्थित होते.

सर्वांच्या प्रार्थनेने काका लवकरच बरे होवून नगर शहरात परतणार असल्याची भावना जनक आहुजा यांनी व्यक्त केली.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसी अन्वये कळविण्यात येते की, खालील परिशिष्टमध्ये वर्णन केलेली शेतजमीन मिळकत विद्यमान मालक श्री. नितीन शिवाजी बोठे, रा- सावेडी, अहिल्यानगर यांच्या खरेदी मालकी वहिवाटीची असून त्याचे प्रत्यक्ष कब्जे वहीवाटीत असलेली होती व आहे. विद्यमान मालक यांनी सदर शेतजमीन मिळकत आमचे अशिलास विकणे बाबतचा करार केला असुन त्यानुसार खरेदीखताचा व्यवहार लवकरच पुर्ण होणार आहे. सदर मिळकती ही संपुर्णपणे निर्वेध व निर्जोखमी असल्याची खात्री व हमी विद्यमान मालक यांनी आमचे अशिलास दिलेली आहे. सदर शेतजमीन मिळकती बाबत कोणाचाही साठेखत, खरेदीखत, गहाण, दान, इजमेंट, वारसा, कर्ज, बक्षीस, दावा, कोर्ट कार्यवाही, कोर्ट स्थगीती आदेश, बोजा, लिज, अगर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवावीत. मुदतीत कोणाची, कोणतीही हरकत न आल्यास सदरील शेतजमीन मिळकत निर्वेध, निर्जोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर खरेदीचा व्यवहार करतील त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**१) मिळकतीचे वर्णन :-** डि. अहिल्यानगर सब डि. व ताो. अहिल्यानगर पैकी मौजे वाळुंज येथील वाळुंज ग्रामपंचायत हद्दीतील हंगामी बागायत शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

सर्व्हे/गट नं. - ११८/१ **क्षेत्र ११ हे ०९ आर व पो.ख. ००हे १६आर** असे एकूण ११हे. २५ आर या संपूर्ण क्षेत्रास आकार रू. ४०.०७ पैसे असून यापैकी उत्तर बाजूकडील ६० आर व पूर्वेकडील मध्यभागाची ०१ हे २३ आर अशी एकूण १ हे ८१ आर आणि पो.ख.- ००हे ०२आर याचा आकार रू. ०६.५४ पैसे

**यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे-**

| सर्व्हे / गट नं. | पुर्वेस/ गट नं. | दक्षिणेस/ गट नं. | पश्चिमेस/ गट नं. | उत्तरेस/ गट नं. |
|---|---|---|---|---|
| ११८/१ | ११७/ब२ व ११८/१ पैकी | ११८/१ पैकी व सीना नदी | ११८/१ पैकी | ११७ ब १ व २ |

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक हंगामी बागायत शेतजमीन मिळकत झाड झुडूप, दगड माती, तालीसह, जाणे येणेच्या हक्कासह सर्व वागणूकीच्या वहिवाटीच्या सर्व हक्क व अधिकारांसहीत तदंगभुत वस्तुंसहीत काहीएक राखुन न ठेवता.

**ॲड. प्रसाद सिध्देश्वर भणगे**
ऑफिस - पर्णकुटी, देशमुख वाडी, सर्जेपुरा, अहिल्यानगर - ४१४००१
मो.नं. ९४२२२२११८४/९८५०८३५८८४.


# दुचाकीस्वाराला रात्री रस्त्यात अडवून मारहाण; गुन्हा दाखल

नगर - रात्रीच्या वेळी दुचाकीवरून जाणाऱ्या युवकास तिघांनी रस्त्यात अडवून दगडाने मारहाण केल्याची घटना १८ एप्रिल रोजी रात्री उशिरा नगर तालुक्यातील तांदळी वडगाव शिवारात घडली. या मारहाणीत सूरज राजेंद्र भोसले (वय २२, रा. तांदळी वडगाव, ता.नगर) हा जखमी झाला आहे.

या प्रकरणी जखमी सुरज भोसले याने दिलेल्या फिर्यादीवरुन राहुल रंगनाथ सोनवणे, ऋषिकेश राहुल सोनवणे, मयूर राहुल सोनवणे (तिघे रा. तांदळी वडगाव, ता. नगर) या संशयितांवर नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पो.हे.कॉ. राहुल थोरात करत आहेत.

